म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र १६२३
IRBK-0101623

IRBK-0101623
IRBK-0101623

लेखक,
श्री. पां. अ. बेलणकर.
S. T. C.

दा.क्र. ९६२३

# हिंदकन्यांची थोरवी

इतकी आहे कीं,

## प्रत्यक्ष परमेश्वर

त्यांच्यापुढें नम्र होतो, त्यांची सेवा करतो !

सीता, सावित्री, द्रौपदी

यांचीं चरित्रें आपणांस हेंच सांगत नाहीं काय ?

आधुनिक काळांतील हिंदकन्या कशा असाव्यात----कशा आहेत

तें तुम्हांला समजाऊन देण्यांसाठीं 'मदर इण्डीआ' च्या निर्मात्यांनीं तयार केलेला नवा

"DAUGHTERS OF INDIA."

# हिंदकन्या

हा नवा संसार--पट

शनिवार ता. २३ डिसेंबर पासून

## पॅथे सिनेमामध्यें सुरू

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शीर्षक.
वा. क्र. ९६२३ नों दि.
११२५

प्रकाशक—मारश्वर वासुदेव दांदे.
प्रिन्सिपल, गोखले एज्युकेशन सोसायटी,
रामचंद्र एम. भट हायस्कूल,
परळ, मुंबई

लेखन प्रयोगादि सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन आहेत.

मुद्रक,—तुकाराम बाजी काराणे,
तुकाराम प्रिंटींग प्रेस, श्रीकृष्ण-निवास,
मंगलवाडी, गिरगांव मुंबई नं. ४

दा.क्र. ९६२३

# हिंदकन्यांची थोरवी

इतकी आहे कीं,

## प्रत्यक्ष परमेश्वर

त्यांच्यापुढें नम्र होतो, त्यांची सेवा करतो !

## सीता, सावित्री, द्रौपदी

यांचीं चरित्रें आपणांस हेंच सांगत नाहीं काय ?

## आधुनिक काळांतील हिंदकन्या कशा असाव्यात----कशा आहेत

तें तुम्हांला समजाऊन देण्यांसाठीं 'मदर इण्डीआ' च्या
निर्मात्यांनीं तयार केलेला नवा

"DAUGHTERS OF INDIA."

# हिंदकन्या

हा नवा संसार--पट

शनिवार ता. २३ डिसेंबर पासून

# पॅथे सिनेमामध्यें सुरू

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय
पा. क्र. 9623

## खास विद्यार्थ्यांकरितां

विद्यार्थ्यांना विशेष उपयुक्त अशी इलेक्ट्रीसिटी संबंधीची माहिती विनामूल्य मिळण्याचें ठिकाण म्हणजेः——

# गोरे देसाई,

इलेक्ट्रीशिअन्स

वसंत निवास, रानडे रोड, दादर.

## FOR STUDENTS ONLY.

**Useful information regarding Electricity will be supplied free of charge.**

**See personally—**

GORE DASAI, Electricians.

---

## स्थापना देवाचें दुकान १९१६.

ठि. केळेवाडी समोर, गिरगांव, मुंबई नं. ४

दिल्ली, आग्रा,



कानपूर

येथील रुबाबदार, टिकाऊ अशा—

चपल्स, सॅण्डल्स, शूजसाठीं गिरगांवातील प्रसिद्ध दुकानीं म्हणजे

लोकमान्य शू चपल्स स्टोअर्स

येथें येऊनच खरेदी करा.

॥ श्री गुरुदेव दत्त ॥

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या रामचंद्र एम. भट हायस्कूलच्या २१ व्या विद्यार्थी-सम्मेलनाकरितां मुद्दाम मुलींच्याकरितां लिहिलेलें व रामचंद्र एम. भट हायस्कूलच्या **ललितकला मंडळानें** रंगभूमीवर आणलेलें

संगीत

# अध्यापिका.

IRBK-0101623


लेखक—

**श्रीयुत पांडुरंग अनंत वेलणकर, S. T. C.**

शिक्षक, आर. एम्. भट हायस्कूल.

संगीत पाठीराखा, संगीत चैनीची चट, संगीत मुठीचा मार, संगीत सात्त्व-संसार, संगीत साक्षरता, इत्यादी नाटकांचे व बुद्धिप्रकाश, देवता, सोन्याचा दिवस अर्थात् १ ऑगष्ट, इत्यादी प्रहसनांचे कर्ते.


प्रस्तावना—श्री. अनंत काणेकर.


बाल वाङ्मय माला पुष्प २३ वें.

गोखले एज्युकेशन सोसायटीचें रामचंद्र एम्. भट हायस्कूल, विद्यार्थ्यांचें स्वराज्य, परेल मुंबई

प्रथमावृत्ति

मार्गशीर्ष शु॥ १० शके १८६१ ] किंमत ६ आणे. [ ता. २१ डिसेंबर सन १९३९.

# आभार.

'संगीत अध्यापिका' ही नाटिका जनताजनार्दनास सादर करितांना अत्यानंद होत आहे. गेल्या वर्षीच स्वराज्यसभेच्या बालवाङ्मयमालेंत, संगीत पाठीराखा, हें २१ वें पुष्प गुंफलें. अवध्या एक वर्षानंतरच पुन्हां पुष्प गुंफण्याचा सुयोग प्राप्त करून दिल्याबद्दल मालेचे उत्पादक आणि माझे परमपूज्य गुरुजी प्रि. मो. वा. दोंदे यांचा मी आजन्म ऋणी राहीन.

नाटिकेचे कथानक सामाजिक असून तींत कन्याविहारांतील अध्यापिकांचें जीवन, आधुनिक शिक्षण-पद्धति व तिचे परिणाम वगैरे गोष्टींचे चित्रण केलें आहे. नाटिकेचा परामर्ष सुप्रसिद्ध कवि आणि साहित्यिक श्री. अनंत काणेकर यांनीं आपल्या प्रस्तावनेंत घेतलेला असल्यामुळें त्याची पुनरावृत्ति करण्याची आवश्यकता नाहीं. श्री. काणेकरांनीं माझ्या विनंतीला मान दिल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. नाटिका लिहीत असतां माझें गुरुजी श्री. दादासाहेब भिंगार्डे व श्री. दत्तोपंत टिपणीस यांचें मला बहुमोल सहाय्य झालें. नाटिकेंतील प्रत्येक प्रसंगावर या गुरुद्वयांशीं साधकबाधक चर्चा करूनच नंतर तो चित्रित केला आहे. नाटिका निर्दोष व्हावी म्हणून त्यांनीं केलेल्या सहाय्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. त्याशिवाय माझें मित्र डॉ. पाटणकर, श्री. भार्गवराम पांगे, श्री. ठाकूर, श्री. जोग, श्री. कुळकर्णी, श्री. पी, एस्. शर्मा व श्री. करंदीकर वगैरे सन्मित्रांनींही हातभार लावल्याबद्दल त्यांचेही आभार मानणें अप्रस्तुत होणार नाहीं. नाटिकेला संगीत स्वरूप श्री. भिंगार्डे यांनीं दिलें. मित्रश्रेष्ठ श्री. भार्गवराम पांगे यांनीं पदांना सुंदर चाली लावून तीं मुलींच्याकडून बसवून घेतली. श्री. भार्गवराम पांगे व त्यांचे सहकारी यांनीं घेतलेल्या परिश्रमाबद्दल त्यांचेंही ऋण आहेच. नाटिकेच्या दिग्दर्शनाचें कामीं माझें मित्र श्री. गुप्ते यांचे अमोल सहाय्य झालें. त्याचबरोबर विद्यार्थिनींनींही मोठ्या हौसेनें नाटिकेंत उत्तम भूमिका करून ती यशस्वी केल्याबद्दल त्यांचेंही कौतुक करावें तेवढें थोडेंच आहे.

नाटिका लिहिण्यापेक्षांही ती पुस्तकरूपानें प्रसिद्ध करणें अत्यंत अवघड आहे. परंतु तुकाराम प्रेसचे चालक व मालक श्री. अण्णासाहेब काराणे यांनीं सध्यांच्या युद्धाच्या बिकट परिस्थितींत ही माझी नाटिका छापण्याची जबाबदारी घेऊन ती यशस्वी रीतीनें पार पाडली श्री. अण्णांच्या या मित्रप्रेमाबद्दल त्यांचे आभार मानायला शब्दही अपुरेच पडतील.

३२, लतीफ बिल्डिंग,
फ्लिन्स्टंट रोड, दादर,
मुंबई १४.
२१-१२-३९.

पां. अ. वेलणकर.

# प्रस्तावना.

श्री. वेलणकर यांची ही ' अध्यापिका ' नाटिका वाचून साधें आणि सुटसुटीत संवाद लिहिण्याचें त्यांनीं जें कौशल्य संपादन केलें आहे त्याबद्दल त्यांचें अभिनंदन करावेंसें वाटतें. ही नाटीका बालवाङ्मय म्हणून लिहिली आहे, आणि त्या दृष्टीनें तिचे दोन विशेष उल्लेखनीय आहेत. एक म्हणजे पुरुषपात्रविरहित अशी ही नाटिका आहे. शाळेंतल्या मुलींना संमेलनाकरितां किंवा दुसऱ्या कसल्याही समारंभाकरितां नाटक बसवितांना मुलींना करावयाला योग्य नाटक मिळणें अतिशय कठीण पडतें. शाळेंतल्या वातावरणाची परिपूर्ण माहिती असलेले आणि त्या वातावरणांशीं तादात्म्य पावलेले असे नाटककार विरळा. श्री. वेलणकर यांच्या नाटिकेचा दुसरा विशेष मी म्हणतों तो हाच.

' अध्यापिकेंत ' ल्या ' कन्याविहार ' चे वातावरण कमालीचें वास्तविक आहे. शिक्षकिणींचे आपापसांतले कलह आणि मत्सर, श्रीमन्त पालकांची खुषामत करण्याचे त्यांचे प्रयत्न वगैरे गोष्टी मुलांनाच काय पण मोठ्यानाही हृद्य वाटतील. छम् छम् वाजणाऱ्या छडीच्या जोरावर शिक्षण देण्याची पूर्वींची पद्धत, आणि हंसत खेळत बालमनाचा विकास करण्याची आधुनिक पद्धत या मधला फरक श्री. वेलणकर यांनीं या नाटिकेंत मोठ्या मार्मिकपणें दाखविला आहे. उघड उघड हें नाटक बोधवादी आहे. तेव्हां ललितवाङ्मयाची कठीण कसोटी याला न लावतां रसिक त्याचें कौतुक करतील, अशी आशा आहे.

१९–१२–३९

अनंत काणेकर.

# प्रकाशक या नात्यानें

विद्यार्थ्यांच्या स्वराज्यसभेतर्फे जी बालवाङ्मयमाला प्रकाशित होत आहे त्या मालेचें 'संगीत अध्यापिका' ही नाटिका तेवीसावें पुष्प आहे. आजपर्यंत ह्या मालेनें बावीस पुस्तकें प्रकाशित केलीं, व जवळजवळ चार पांच पुस्तकें प्रकाशनासाठीं येऊन राहिलीं आहेत. बावीस पुस्तकांमध्यें सहा नाटिका पुरुषपात्रविरहित असून शाळेंतील विद्यार्थिनींनाच रंगभूमीवर आणण्यास सुलभ अशा आहेत. श्री. वेलणकर यांची 'संगीत अध्यापिका' ही नाटिका अशा प्रकारची सातवी नाटिका आहे व ती इतर नाटिकाप्रमाणें बालप्रिय होईल यांत शंका नाहीं.

श्री. वेलणकर याच शाळेंत विद्यार्थी होते. संमेलन व इतर प्रसंगीं शाळेच्या रंगभूमीवर होणाऱ्या नाट्यप्रयोगामध्यें ते विद्यार्थी असतांना चांगल्या तऱ्हेनें भाग घेत असत. मॅट्रिकची परीक्षा दिल्यावर याच संस्थेत त्यांनीं शिक्षकाचा पेशा पत्करला. आपण चांगला नट व्हावें व आपल्या हातून चांगलीं नाटकें लिहिलीं जावींत अशी त्यांची प्रबळ मनीषा आहे. त्यांनीं आतांपर्यंत ल्हान मोठीं बरींच नाटकें लिहिलीं आहेत व त्यापैकीं त्यांचीं कांहीं नाटकें रंगभूमीवर यशस्वी झालीं आहेत. यंदाच्या विद्यार्थ्यांच्या वार्षिक संमेलनासाठीं त्यांनीं 'संगीत अध्यापिका' ही नाटिका मुद्दाम लिहिली व विद्यार्थिनींनीं शाळेच्या एकविसाव्या संमेलनप्रसंगीं ती रंगभूमीवर आणली.

केवळ प्रचारक म्हणूनच हे चार शब्द मी लिहीत असल्यामुळें नाटिकेचा परामर्ष घेण्याचें काम माझें नाहीं. तथापि एवढें नमूद करणें जरूर आहे कीं, श्री. वेलणकर यांनीं शालेय विषयावर ही छोटीशी नाटिका लिहून व विशेषतः तिचें प्रकाशन शाळेच्या बालवाङ्मयमालेकडे सोंपवून विद्यार्थ्यांना कायमचें ऋणी करून ठेवलें आहे. शाळेंतील सहासात शिक्षकांनीं अशाप्रकारचीं पुष्पें या मालेमध्यें गुंफलीं आहेत. या सांप्रदायांत सामील होऊन शालेय नाटककार म्हणून श्री. वेलणकर प्रथितयश झाले याबद्दल, पूर्वीचे याच शाळेचे विद्यार्थी व आजचे सहशिक्षक या नात्यानें त्यांचें मी अभिनंदन करतों व स्वराज्यसभेच्या वतीनें त्यांचें मनःपूर्वक आभार मानतों.

मोरेश्वर वासुदेव दोंदे.

म. म. सं. ठाणे, वाचनालय ठाणे.
क्र. ... ९८२३ ... ता. दि ...
वि. ... श्री गुरुदेवदत्त ...

संगीत

# अध्यापिका.

## अंक पहिला.

[ कन्याविहार—वसतिगृहापुढील बाग—मुली स्वतः तयार केलेल्या कुंड्याना पाणी घालीत व मशागत करीत आहेत. ]

### पद १ लें.

फुलबाग अहाहा फुलला। देव वसंत जणु जगिं सजला ॥
देव मोदभरें बाई हंसला। आनंद जगामधीं भरला ॥
वायु मंदचरें हा सुखदा। मधुवास वाटितो सकलां ॥
उल्हास नांदतो सततां। फुलबाग असा हा फुलतां ॥
आनंद तिथें देव रमला। देव गमे फुलवनीं वसला ॥
घालुनि नित्य जिवना। अजि सर्थे अम्ही पुजिला ॥

[ पद संपल्यावर मुलींचा आंधळ्याकोशींबिरीचा खेळ सुरू होतो.]

### पद २ रें.

शालन—चला साजणी खेळुं झणी। लपंडाव ग सकल गुणी ॥ध्रु.॥
वासंती— पहिलं राज्यपण कुणाकडे।
शालन— नको कुणातर माझ्याकडे ॥
नलिनी— लपा जाऊनि सर्व दुरी।
किशोरी— फजिति करूं या इची पुरी ॥
मिनाक्षी—पहा आलि कोण पाठिकडे। लपली जा ती त्या तिकडे॥
शालन—कोण ग बाई चावट ही। दिसते ना मज बघ म्हणते॥१॥

[ बराच वेळ कोणी न सांपडल्यामुळें ती कंटाळते. त्रासून डोळे सोडते. सर्व मुली तिच्याभोंवती गोळा होतात. ]

**शालन**—आम्हीं नाहीं खेळत जा. दमलें बाई मी. ( सुस्कारते. )

**नलिनी**—असा त्रागा करून नाहीं हो चालायचं आतां. आमचं राज्य दे आधीं.

**शालन**—( रुमाल अंगावर फेकते. ) हें घ्या तुमचं राज्य.

**वासंती**—अस्सं काय ? मघां मीनावर राज्य होतं. तिला कोणी सांपडत नव्हतं तेव्हां कशी हंसत होतीस ! तिनं केला का कांगावा तुझ्यासारखा ?

**शालन**—करायचा होता तिनं. आम्ही कांहीं बंदी केली नव्हती कुणाला.

**नलिनी**—असं प्रत्येकजण करूं लागली तर आपला खेळ होईल का ? ( शालनच्या पाठीवर हात फिरवते. ) शालन, विचार कर. आपण कशाकरितां खेळ खेळतों.

**शालन**—मनाची करमणूक व्हावी म्हणून. गमतीसाठीं खेळतों आपण.

**नलिनी**—खरं ना हें ? मग तूं राज्य दिलं नाहींस तर तें कुणी द्यायचं ? दुसऱ्यावरचं राज्य घ्यायला तूं होशील का तयार ?

**शालन**—मी काय म्हणून घेईन ? ज्याचं त्यानंच तें द्यायला पाहिजे.

**मीनाक्षी**—मग बाईसाहेब, आपल्या बाबतींत मात्र ?

**नलिनी**—थांब मीना जरा. शालन, ज्याचं राज्य त्यानंच दिलं पाहिजे हें खरं ना ? मग दे बरं तुझं राज्य तूं.

**शालन**—बरं बाई देतें ( मुली आनंदानें टाळ्या वाजवितात. )

**किशोरी**—पण रागावून नको हो. हंसत खेळत आनंदानं सुरवात करायची.

## पद ३ रें.

**नलिनी**— खुललि ग बाई फुलराणी ॥
**वासंती**— भृंगत ती गाइल गाणीं ॥
**किशोरी**— गुंगत त्यांमधीं फुलराणी ॥
**मीनाक्षी**— भूल पडे ग अवधानीं ॥

**वासंती—** निश्चल गमते बकध्यानीं ॥
**किशोरी—** मिळे मासळि न अशा गुणी ॥
**शालन—सांपडे बाई अवचट ही। कोण ग पण तीं झणी पाहीं ॥१॥**

[ पूर्ववत् खेळ चालू होतो 'अचला' फुलें घेऊन येते. शालन अचलेला धरते. [

**शालन**—घ्या बाई एकदाचं राज्य. सुटलें बाई एकदांची !

[ मुली हंसतात. शालन रुमाल सोडते. अचलेला पाहून शरमते. अचला तिला पोटाशीं धरते. मुली 'बाईना का राज्य दिलंस ?' असें तिला विचारतात. ]

**वासंती—**अय्या ! बाईना का राज्य दिलंस ?

**मीनाक्षी**—मग तर मोठीच गम्मत होणार ! बाई, द्या आतां आमचं राज्यं.

**अचला—**अग, तुमचं राज्य कांहीं मी घेऊन जात नाहीं. तें तुमचं तुम्हांलाच देतें. पण आधीं हा नजराणा घ्याल कीं नाहीं. आतां एकेका राणीला नजराणा देतें अन् राज्यही देतें. [प्रत्येकीच्या डोक्यांत फूल घालते. एक शिल्लक रहातें. विचार करते. ] पण एक राहिलं !

**नलिनी—**राहील कसं तें ? आमच्यांत आणखी एक राणी आहे. बाई, द्या तें इकडं ( फूल घेऊन अचलेच्या डोक्यांत घालते. ) मिळालीं सर्वांना ?

**शालन—**आतां बाई राज्य द्या आमचं.

**अचला—**फुलं दिली ना तुम्हांला ? आतां कशाला हवं राज्य ?

**मीनाक्षी—**तें कांहीं नाहीं. राज्य हें दिलंच पाहिजे.

**अचला—**अस्सं ? कोणाला पाहिजे राज्य ? ( सर्व हात वर करतात. ) अं, हं ! सर्वांना नाहीं मिळायचं एकदम. एकीलाच कुणाला तरी मिळेल.

**नलिनी—**बाई, अशानं आम्ही फसणार नाहीं हं ! शालननं तुम्हांला पकडलं आहे. राज्य तुम्हीं स्वतः द्यायला पाहिजे. राज्य द्यायचं असतं, घ्यायचं नसतं.

**अचला**—मग शिवाजीनं राज्य घ्यायची खटपट व्यर्थ केली म्हणायाची !

**किशोरी—**तसलं नव्हे हें राज्य.

**अचला—**हो बाई ! हें अंध राज्य. तें दिलंच पाहिजे. मला नको ग बाई तें.

**शालन—**मग बाई, गाणं तरी म्हणून दाखवा एक.

**नलिनी**—नाहीं अं बाई, राज्य पहिल्यांदा पाहिजे.

**वासंती**—आणि गाणंही म्हटलं पाहिजे.

**मीनाक्षी**—नाहींतर असं करा. राज्य द्या अन् गाणंही गा. दोन्ही एकदम.

**नलिनी**—हां हां ! ही बरी युक्ति आहे. असंच करा बाई.

**अचला**—वा ! वा ! बऱ्याच हुशार मुली दिसतां तुम्हीं. सगळं आपणच ठरवताहांत अगदीं. बरं. राज्य नाहीं दिलं तर नाहीं चालायचं ?

**नलिनी**—मुळींच चालायचं नाहीं. तुम्हीं राज्य दिलं नाहीं तर आम्हीं मुळीं बोलणारच नाहीं तुमच्याशीं.

[ सर्व मुली तोंडें फिरवितात. एकमेकींना गप्प राहण्याबद्दल खुणावतात. ]

**अचला**—बराच मोठा फुगा फुगलेला दिसतोय. नाहींना बोलत माझ्याशीं? ( मुली एकमेकींना डोळे मिचकावतात. ) हं, आतां काय करावं ? ( बारीक खडे जमा करून खेळायला सुरवात करते. ) कोणाला यायचं असेल खेळायला तर यावं. आमची कांहीं हरकत नाहीं. ( खेळते. )

**शालन**—( खडा हललेला पाहून टाळी वाजवते. ) बाई, हालला खडा ! गेला तुमचा डाव.

**अचला**—अस्सं होय ? बरं तर तूं खेळ आतां.

**शालन**—(खेळायला जाते ) आतां पहा हुंडी लावते तुमच्यावर.

**मीनाक्षी**—आम्ही पण येऊं खेळायला.

**सर्व मुली**—आम्हींसुद्धां खेळूं.

**अचला**—आम्हीं कुठं तुम्हांला नको म्हटलं होतं ?

**शालन**—पण बाई, हा खेळ आतां नको. आमचं राज्यच द्या तुम्हीं.

**अचला**—अजून आहेच का तें तुमच्या लक्षांत ?

**मुली**—आम्हीं बऱ्या विसरूं !

[ मुली अचलेचे डोळे बांधतात. खेळ सुरूं होतो. इतक्यांत बागेच्या दुसऱ्या बाजूला शोभनाबाई, कृष्णाबाई व सरलाबाई येतात. कृष्णाबाई शोभनाबाईंना खुणावतात. खेळतां खेळतां मुली दिसेनाशा होतात ]

**कृष्णाबाई**—पाहिलंत शोभनाबाई.

**शोभनाबाई**—इथं तर नुसता धुडगूस चालला आहे.

**कृष्णाबाई**—हेंच आजकालचं शिक्षण. ही Play-way method बरं. पण शिक्षण मात्र यथातथाच.

**सरलाबाई**—कां बरं असं म्हणतां ? लहान मुलांना तरीं हीच पद्धत योग्य आहे, असं मोठमोठ्या शिक्षणतज्ज्ञांनीं कबूल केलं आहे. खेळीमेळीच्या वातावरणांत लहान मुलांना शिक्षण दिलं तर तें त्यांच्या मनांवर जसं बिंबतं, तसं कांहीं चार भिंतींत मुलांना कोंडून, गंभीर वातावरणांत, छडीच्या छनछनाटांत लादलेलं शिक्षण त्यांच्या मनावर ठसत नाहीं.

**कृष्णाबाई**—ऐकलंत का हें व्याख्यान शोभनाबाई ?

**शोभनाबाई**—म्हणजे हें शिक्षणच चाललं आहे तर ! मला वाटलं कीं मास्तरीणबाई 'कुंकू' सिनेमांतील शांता आपटेची नक्कल करताहेत. अशा पोरखेळांतून शिक्षण व्हायला लागलं तर शाळा बंदच करून टाकायला पाहिजेत!

**अचला**—( मुलींना शोधत येते ) अजून कसं कुणी सांपडत नाहीं ! तुम्हीं अगदीं कट केलेला दिसतोय ! मी हरलें आतां ( डाळे सोडते. मुली तिच्याभोंवतीं गोळा होतात. )

**शालन**—बाई, आज रात्रीं आम्हांला छानशी गोष्ट सांगाल ना ?

**अचला**—हो, हो ! कसली बरं सांगूं ?

**वासंती**—कसलीही सांगा. तुमच्या गोष्टी छान असतात.

**नलिनी**—आणि कीं नाहीं त्या आमच्या लक्षांतसुद्धां राहतात.

**मीनाक्षी**—आम्हीं सुटींत घरीं गेल्यावर सगळ्या गोष्टी सांगतों आईला.

**सर्व मुली**—आम्हींसुद्धां सांगतों बाई.

**अचला**—पण त्यांना आवडतात का आपल्या गोष्टी ?

**किशोरी**—हो, हो ! न आवडायला काय झालं बाई ? माझी आई तर इतकी खूष होते कीं गोष्टीबद्दल मोबदला म्हणून एक लाडू देते.

**अचला**—'भम्मक लाडू' नाहीं ना ? ( सर्वजणी हंसतात. )

**शालन**—पण माझ्या आईला मात्र आपल्या गोष्टी मुळींच आवडत नाहींत. ती देते मला धम्मक लाडू. पण पपांना फार आवडतात हो तुमच्या गोष्टी. ते मला गोष्ट सांगायला सांगतात. तुमची कीं नाहीं पपा फार वहावा करतात. [ शोभनाबाईस राग येतो ]

**वासंती**—मग बाई सांगाल ना गोष्ट ?

**नलिनी**—पण शालनच्या आईला आवडेल अशी सांगा हं. म्हणजे पाहूं या शालनला कोणता लाडू मिळतो तो.

**अचला**—हो का शालन ? [ ती होय म्हणते. ] बरं तर. आतां कीं नाहीं आपण बागेंत काम करूं या थोडा वेळ.

[ मुली बागेंत काम करतात.–पाणी आणतात–झाडांना पाणी घालतात–कुंड्या नीट लावतात. ]

**शोभनाबाई**—काय विचित्र पोर आहे तरी ! घरच्या गोष्टी अगदी बेधडक सांगत होती बाईजवळ.

**सरलाबाई**—हीच तर खऱ्या शिक्षकाची कसोटी आहे. विद्यार्थ्यांनं मन-मोकळेपणानं शिक्षकाजवळ वागलं बोललं म्हणजेच शिक्षकाला त्याच्या आवडी-निवडी समजतात, अन् शिक्षण द्यायला सुलभ होतं. इथं मुलींनां परकेपणा वाटतच नाहीं. या बाई मुलींना आईसारख्या वाटतात. आईचा जिव्हाळा अचलाबाईंच्या ठिकाणीं असल्यामुळं खाजगी गोष्टीसुद्धां मुली त्यांच्याजवळ मन-मोकळेपणानं सांगतात.

**शोभनाबाई**—पण असल्या खिदळखान्यांत पोरींना गोष्टी काय समजत असतील देव जाणे !

**सरलाबाई**—चुकताहांत तुम्हीं. अचलेची गोष्ट सांगण्याची हातोटीच अशी आहे कीं मुली अगदी ऐकतांना तादात्म्य पावतात. गोष्टींतला शब्द न् शब्द मुलींच्या लक्षांत राहातो. ही तन्मयता कशानं होते बरं ? तर खेळीमेळीच्या वाता-वरणामुळंच ! असं वातावरण निर्माण करूनच अचलाबाई मुलींच्या मनावर छोट्या-छोट्या पण बोधकारक गोष्टी सांगून मोठमोठीं तत्त्वं त्यांच्या मनावर बिंबवित असतात.

**कृष्णाबाई**—अशानं तत्वं समजायला लागलीं तर बघायलाच नको. ज्या मुलींना बाईचा धाक नाहीं त्या मुली का लक्ष लावून ऐकायला बसल्या आहेत ?

**शोभनाबाई**—तसं कशाला ? आमच्या शालनचंच उदाहरण घ्या ना ? पूर्वीं ती माझं मुळींच ऐकत नसे. पण हल्लीं धांकात ठेवल्यामुळं कशी सुतासारखी सरळ आली आहे. मुलांना चांगला धाक असल्याशिवाय कामं होत नसतात बरं सरलाबाई.

**सरलाबाई**—चुकीची आहे आपली कल्पना. ती ऐकायला लागली तें धाकानं नसून या कन्याविहारांतील शिक्षणामुळंच.

**शोभनाबाई**—कसलं आलं आहे शिक्षण ! मुलींच्या शिक्षणाच्या नांवाखालीं बाईनीं आपल्या जिवाची करमणूक करायची आणि लोकांच्या घरची माहिती काढायची. मुलींच्या शिक्षणाचं आपलं नांव.

**सरलाबाई**—तुम्हांला पाहायची आहे का प्रचिती ? बोला. हातच्या कांकणाला आरसा कशाला ? मुलींची तुम्हीं आज चांचणीच घेऊन पहा. म्हणजे कळेलच मुलींची हुशारी. शिवाय अचलेच्या शिक्षणाचीसुद्धां कसोटी लागेल.

**कृष्णाबाई**—कशाला उगाच फजिती करून घेता ? मी वर्गात गेलें कीं मुली नुसत्या थरथर कांपतात. मी जीव तोडून शिकवतें पण एकीच्या डोक्यांत शिरेल तर शपथ ! समजलं का विचारलं कीं नंदीबैलासारखी मान हालवतात. आणि प्रश्न विचारले कीं आटपलाच बाजार ! आणि इथं तर काय साराच सावळागोंधळ. म्हणून म्हणतें परीक्षेच्या नका भानगडींत पडू बाई.

**सरलाबाई**—असं आहे तर पाहूंच या मग ! होऊं दे माझी फजिती. शोभनाबाई व्हा पुढं.

[ त्या पुढें होतात. अचला त्यांचें स्वागत करते. ती स्वतः व इतर मुली आंतून खुर्च्या आणतात. शालनला खुर्ची आणतांना पाहून शोभनाबाईला राग येतो. सर्वजणी खुर्च्यांवर बसतात. ]

**शोभनाबाई**—पण हें काय ? माझी शालन कां खुर्ची आणते ? मुलींकडून काम करून घेतां तर बाई ठेवायला काय झालं तुम्हांला ?

**कृष्णाबाई**—एक सोडून दोन बाया आहेत.

**शोभनाबाई**—इथं साऱ्याच बाया आहेत. पण—

**शालन**—आई, या मुलींनीं नाहीं वाटतं आणल्या खुर्च्या ? शिवाय तुम्ही आमच्या इथं पाहुण्या आलांत. तुमचं आदरातिथ्य नोकरांकडून केलेलं बरं नाहीं दिसायचं तें. नाहीं कां ग नलू ?

**नलिनी**—बरोबर आहे. आपण आपलं कर्तव्य केलं नसतं तर मात्र आपली चूक झाली असती. आणि यांनीच म्हटलं असतं कीं पोरींना रीत नाहीं. आपल्या बाईंनीं पण स्वतः खुर्ची आणली.

**शोभनाबाई**—मग ? फी नाहीं वाटतं घेत ठोकून ! चांगली दहा रुपये फी भरतों आहोंत महिन्याला. त्यांचं कसलं कौतुक सांगतेस मला.

**अचला**—(मुलींना) तुम्हीं जा आतां. आपल्या कामाला लागा.

**सरलाबाई**—शोभनाबाई, मुलींच्या देखत असं बोलणं बरं दिसत नाहीं !

**शोभनाबाई**—काय झालं बरं न दिसायला ? आम्ही आमच्या मुली तुमच्या इथं शिकायला पाठवतों. हीं असलीं हलकीं सलकीं कामं करायला नाहीं कांहीं !

**कृष्णाबाई**—( इकडे तिकडे पहात ) हेंसुद्धां शिक्षणच आहे. अगदीं मॉडर्न टाईपचं !

**अचला**—काय पहातां कृष्णाबाई ? कांहीं हवं आहे का तुम्हांला !

**कृष्णाबाई**—अं, हं— आपलं सहज !

**सरलाबाई**—का कृष्णाबाई, आहेत का मुली उभ्या तिथं ? तुम्हांला वाटलं कीं मुलींना आपल्यासारखीच संवय असेल. पण झाली ना खात्री आतां ? अहो, लहान मुलं अनुकरणप्रिय असतात. जसं आपण वागावं तसंच तीं वागायचीं.

**शोभनाबाई**—म्हणूनच म्हणतें बाईंनीं वाटेल तसं वागावं आणि मुलींनीं त्यांचं अनुकरण करावं. चांगलंच आहे तुमचं शिक्षण !

**अचला**—बाईसाहेब, आपल्याला राग आलेला दिसतोय. वास्तविक मुलींनीं शिष्टाचार पाळला याबद्दल तुम्हांला त्यांचं कौतुक वाटायला पाहिजे होतं. आपल्याला पाहतांक्षणींच न सांगतांच त्यांनीं आपला सत्कार केला. त्यांना आपलं

करणं इभ्रतीला कमीपणा आणणारं आहे असं मुळींच वाटत नाहीं आणि वाटणारही नाहीं. वाटल्यास आपण आपल्या शालनलाच विचारून पहा. मुलींनीं विहाराची शिस्त पाळलेली पाहून आम्हांला आनंद होतो. मग आपल्यालाच त्यांत गैर असं काय वाटतं ?

**कृष्णाबाई**—कां वाटूं नये ? ज्यांच्या घरीं लक्ष्मी पाणी भरते त्यांच्या मुलीनं गड्यामोलकरणीची कामं करावी अन् तेही आपल्या देखत !

**सरलाबाई**—आणि इथंही लक्ष्मीच पाणी भरते. शिवाय या बाईंच्या जिव्हाग्रीं सरस्वती नाचते आहे.

**शोभनाबाई**—जिव्हाग्रींच कां ? प्रत्यक्ष सरस्वतीच दिसत होती नाचतांना ?

**अचला**—बोलण्यानं बोलणं वाढतं. वाद वाढतो.

**शोभनाबाई**—आमचं बोलणं तुम्हांला रुचत नाहीं !

**कृष्णाबाई**—पण सरलाबाईंची तरफदारी मात्र आवडते.

**शोभनाबाई**—आमच्यासारख्या लक्षाधीशांच्या मुलीला असलीं कनिष्ठ दर्जाचीं कामं सांगितलेलीं आम्हांली रुचायचीं नाहींत.

**अचला**—बाईसाहेब, या पवित्र विद्यामंदिरांत पाय ठेवतांच जात–गोत श्रेष्ठ–कनिष्ठ, राव–रंक, हा सारा भेदभाव पार लयाला जातो. निरनिराळ्या आचाराविचारांच्या, भिन्न संस्कृतींच्या नि परिस्थितींच्या मुली या नंदनवनांत येतांच एकरूप होतात. मग आपण होऊन त्यांच्या मनांत भेदभाव उत्पन्न केला तर त्या कोंवळ्या मुलांच्या कोमल भावना दुखावणार नाहींत का ?

**शोभनाबाई**—पण आमच्या भावना दुखावतात त्याचं काय ? मुलांच्या भावना आम्हींच उत्पन्न करणार ना ? आम्हीं सांगूं त्याप्रमाणेंच त्यांनीं वागलं पाहिजे.

**अचला**—छे, छे ! बालमनाची अशी हेटाळणी करूं नका. जगांतली विषमता इतक्या लहान वयांत त्यांच्या नजरेस आणणं, आपले विचार त्यांच्या मर्जीविरुद्ध त्यांच्यावर लादणं हें केव्हांही विघातकच होईल.

**सरलाबाई**—आणि त्याकरतांच या नवीन पद्धतीनं शिक्षण देतांना शिक्षकाला मुलांच्या कलानंच घ्यावं लागतं. इतर शिक्षणाबरोबरच मुलाचं शील आणि व्यक्तिमत्त्व उत्तेजित करण्याची जबाबदारी अशा विहारांतून शिक्षकावर असते.

**शोभनाबाई**--कसलं एवढं शिक्षण देता हो? परवां बक्षिस समारंभाच्या वेळीं यांच्या तोंडूनसुद्धां आपल्या शाळेचा बराच बोलबाला मी ऐकला. पण ऐकलेलं आणि पाहिलेलं यांत जमीनअस्मानाचं अंतर दिसतंय.

**कृष्णाबाई**—फुकटचा मोठेपणा मिळाला कीं कोणीही टिमकी वाजवूं लागतो.

**शोभनाबाई**—हें मात्र खरं. माझंच सांगतें ना. मी नव्हतें का त्या भगिनी-समाजाच्या सम्मेलनाला अध्यक्ष? तेव्हां मी त्यांची अगदीं तोंड फाटेपर्यंत स्तुति केली. समाजाचा आणि माझा फार निकटचा संबंध आहे. इथलं शिक्षण फार श्रेष्ठ दर्जाचं असतं. चालक वर्ग फारच मेहनती अन् हुशार आहे. त्यांच्या परिश्रमाचं फळ म्हणूनच—वगैरे, वगैरे. तुम्ही होतांच त्यावेळीं.

**कृष्णाबाई**—पण शोभनाबाई, तुम्हीं वाचलेलं आपलं भाषण फारच मननीय होतं. चांगलं लिहिलं होतं तुम्हीं.

**शोभनाबाई**—अहो मी कुठली लिहायला? तुम्हांला म्हणून सांगतें. मला यांनींच लिहून दिलं होतं तें. तेव्हां अचलाबाईचं शिक्षण तें काय असणार याची मला पूर्ण कल्पना आहे.

**अचला**—परतु एखाद दुसऱ्या संस्थेवरून साऱ्या संस्थांना एकाच मापानं मोजणं तितकसं रास्त—

**शोभनाबाई**—हें पांडित्य मला नका सांगू उगाच. गांव तिथं महारवाडा असायचाच. फक्त कमी अधिक प्रमाण पडेल इतकंच.

**सरलाबाई**—पण तुम्हीं एकदां विहार पहाल तर आपलं कलुषित झालेलं मन खात्रीनं बदलल्याशिवाय राहाणार नाहीं.

**अचला**—पण मला वाटतं कीं आपलं मन कलुषित झालेलं नसून ते कोणी तरी केलेलं आहे.

**कृष्णाबाई**—(मध्येंच) असं म्हणायला तुमच्याजवळ काय आधार आहे?

**अचला**—आधार? आधार अगदीं सबळ आहे. तो आधार दाखवला कीं आपला प्रश्न मात्र निराधार होईल.

**शोभनाबाई**—असा कोणता आधार आपण दाखवूं शकतां?

**अचला**—आपल्या सहीचा?

**शोभनाबाई**—माझ्या सहीचा ?

**अचला**—हो! दीड एक वर्षापूर्वीची गोष्ट. आपण विहाराला भेट दिलीत. मी त्यावेळीं नवीन होतें. आपण विहारांतील कार्याबद्दल माझ्याजवळ मनमोकळेपणानं चर्चा केलीत, आणि आमच्या शेरेबुकांत शेरा लिहिलांत. कालच जुनं रेकॉर्ड चाळतां चाळतां मला पुन्हां वाचायला मिळाला तो.

**कृष्णाबाई**—बरं मग परिस्थितीनुरूप मतं बदलत नसतात वाटतं ?

**सरलाबाई**—बदलतात. पण हें मतपरिवर्तन व्हायला अशी कोणती परिस्थिति कारणीभूत झाली ? मला तर कांहींच कारण दिसत नाहीं.

**अचला**—विहाराच्या व्यवस्थेंत तर बिलकूल फरक झालेला नाहीं. उलट या दीड वर्षांत विहाराची भरभराट झाली आहे. शिक्षणक्षेत्रांत विहाराबद्दल मोठमोठ्या शिक्षणतज्ज्ञांनीं प्रशंसोद्गार काढले आहेत. तेव्हां आपलं मतपरिवर्तन झालेलं नसून तें केलेलं आहे खास !

**शोभनाबाई**—अचलाबाई, तुमचं म्हणणं मला—

**कृष्णाबाई**—( मध्येंच अडवून ) शोभनाबाई, आपण मुलींची चांचणी घेणार होतां ना ? सरलाबाईंनीं बोलतां बोलतां परीक्षेला कलाटणी दिली. पण मी बरी विसरेन ?

**सरलाबाई**—तुम्हीं कशा विसराल ? कारण तुमचीच परीक्षा व्हायची आहे त्यांत. अचलाबाई, सांगतेंच तुम्हांला आतां. तुमचा खेळ चालला असतानांच आम्हीं आलों. आडून सर्व प्रकार आम्ही पाहिलेला आहे. तुमच्या ह्या शिक्षणानं मुलींना शिक्षण कितपत मिळतं याची यांना जरा खात्री करून द्यायची आहे. हांक मारा बरं मुलींना.

**अचला**—( उठून ) शालन, ए शालन ?

**शालन**—( आंतून ) आलें बाई. ( धांवत येते. )

**कृष्णाबाई**—तुम्हीं सगळ्याजणी आतां इकडेच या लवकर.

**शालन**—( निघते ) अय्या ! या पहा, चहाचं घेऊनच आल्या सर्वजणी.

( मुली चहापानाचें साहित्य घेऊन येतात. टेबलावर ठेवून जातात. )

**अचला**—शाबास ! बाईसाहेब, आतां आधीं चहा घेऊं या ( अचला सर्वांना चहा देते. )

**शोभनाबाई**—मुलींनींच केला कीं काय चहा ?

**सरलाबाई**—छे हो ! अवकाश आहे त्यांना अजून.

**शोभनाबाई**—मुलींना चहाच देतां का तुम्हीं ?

**अचला**—नाहीं. त्यांना दूध देतों आम्हीं.

**शोभनाबाई**—असं ? सर्व जणी घेतात का दूध हौसेनं ?

**अचला**—नवीन आल्या म्हणजे करतात थोडं कांकूं ! पण त्यांना नीट समजावून सांगितलं कीं इतराप्रमाणं घेतात दूध.

**कृष्णाबाई**—हो ! बसल्या आहेत दूध घ्यायला ! हल्लीं रांगतं मूलसुद्धां चहा-साठीं हट्ट धरून बसतं. तर या पोरी का दूध घेणार ! कशाला सांगता उगीच बडेजाव.

**सरलाबाई**—यांत कसला बडेजाव ! त्यांनीं खरी वस्तुस्थिति सांगितली. त्यांना नाहीं तिखट मीठ लावून सांगायची संवय.

**अचला**—बरं बाईसाहेब, परीक्षा घेता ना मुलींची ? मी आणतेंच त्यांना बोलावून.

**कृष्णाबाई**—(एकदम उठून) अं, हं ! तुम्ही कशाला जाता ? मीच जातें.

**शोभनाबाई**—[ त्यांना बसवून ] तुम्ही कशाला उगाच श्रम घेतां ? जाऊं दे त्यानांच.

**कृष्णाबाई**—छे हो ! तुम्हांला नाहीं कळायचं त्यांतलं इंगित. मीच आलें जाऊन.

**सरलाबाई**—कृष्णाबाई, कमाल आहे तुमच्या संशयी वृत्तीची ! अचलाबाई मुलींना पढवून ठेवतील अशी शंका आली नाहीं कां तुम्हांला ? अचलाबाईंना आत्म-विश्वास नसता तर त्यांनीं हें कबूलच केलं नसतं. कांहींतरी कारण काढून त्यांना तुम्हांला चकवता आलं असतं. कां खरं कीं नाहीं ? आतां कां बोलत नाहीं ? कृष्णाबाई, स्वतःच्या सहकाऱ्याबद्दल इतका अविश्वास वाटणं कांहीं चांगलं नाहीं. ठीक आहे. अचलाबाई, इथूनच हांक मारा त्यांना. [ मुली येतात. ]

**शालन**—बाई, मघां तुम्ही सर्वांना इथं जमायला सांगितलं होतं ना ? आम्हीं विसरूनच गेलों चहाच्या गडबडींत. पण आठवण होतांच धांवत आलों एकदम. काय काम आहे बाई ?

**अचला**—आतां कीं नाहीं परीक्षा आहे तुमची.

**मुली**—परीक्षा !

**मीनाक्षी**—तोंडी की लेखी ?

**अचला**—तोंडीच.

**वासंती**—म्हणजे मागं रावसाहेबांनीं घेतली तशी ?

**शालन**—अग कशी का होईना ! आपल्या आजपर्यंत एवढ्या परीक्षा झाल्या आहेत. पण बाई, परीक्षा घेणार आहे कोण ?

**सरलाबाई**—हं शोभनाबाई, करा सुरवात.

**शोभनाबाई**—मी ? मला नाहीं जुळायचं परीक्षा घ्यायला. तुम्हीच परीक्षा घ्या. मी आपला शेराच देईन—

**सरलाबाई**—तोही मागाहून.

**शोभनाबाई**—कृष्णाबाई, घ्या हो यांची परीक्षा. अगदीं कसून घ्या.

**कृष्णाबाई**—तुम्ही जो हा नाचगाण्याचा धांगडधिंगा घालता तो तुम्हांला आवडतो ? काय मिळतं तुम्हांला नाचून ?

**शालन**—आम्हांला नाच फार आवडतो. नाचण्यानं व्यायामही होतो शरीराला.

**नलिनी**—शिवाय मनाची करमणूक होऊन आनंद वाटतो. बाई आह्मांला हौसेनं शिकवतात. आह्मीदेखील हौसेनं शिकतों.

**कृष्णाबाई**—बरं बरं! तें नाहीं मी विचारलं. हिंदुस्थानांत नृत्यकलेंत उत्तम यश कोणीं संपादन केलं तें माहीत आहे तुह्मांला ?

**सर्व मुली**—हो ! हो ! मी सांगतें ! मी सांगते. ( हात वर करतात. )

**शोभनाबाई**—त्या लहान मुलीला विचारा कृष्णाबाई.

**कृष्णाबाई**—हं सांग बरं मीनाक्षी.

**मीनाक्षी**—उदयशंकर आणि मेनका. हिंदुस्थानांतच नाहीं तर परदेशांतसुद्धां नांवलौकीक मिळवला आहे त्यांनीं.

**शोभनाबाई**—आणि काय ग, वाकडं तिकडं नाचतांना एखादवेळ हात पाय मुरगळला तर त्याला जबाबदार कोण ?

**किशोरी**—जबाबदार आम्हीच! कारण चुकल्यामुळं तसं होणार. तेव्हां चूक न होऊं देण्याबद्दल खबरदारी घ्यायची म्हणजे झालं.

**वासंती**—आणि यदाकदाचित् झालंच तसं तर आमच्या बाई आहेतच. खेळतांना नाहीं का बारीक सारीक अपघात होत?

**किशोरी**—खेळतांना, धांवतांना कोणाला खरचटलं, कापलं तर आम्हीच प्रथमोपचार करतों. आमच्या गाइडबाईनीं शिकवलं आहे आम्हांला.

**शोभनाबाई**—अरे वा! मोठ्या डॉक्टरणीच आहांत तर तुम्ही!

**कृष्णाबाई**—बरं. परदेशांतून एखादा प्रवासी आला तर आपल्या देशाचं वैभव त्याला दाखवण्यासाठीं कोणतं ठिकाण दाखवाल?

**शालन**—हातीच्या! आग्र्याचा ताजमहाल!

**शोभनाबाई**—ताजमहाल? ताजमहाल कशाला? मी तर त्याला नाशिकच्या नाहींतर काशीच्या गंगामाईच्या घाटावर नेईन! हो! गंगेचं महत्व काय कमी आहे? कुठं गुप्त होईल अन् कुठं उत्पन्न होईल पत्ताच लागायचा नाहीं! शिवाय पुण्याची पर्वती आणि शनिवारवाडाही कमी महत्वाचा नाहीं.

**कृष्णाबाई**—बाईनीं सांगितलेल्या गोष्टी तुम्हांला आवडतात का? [ मुली 'हो' म्हणतात. ] कां?

**वासंती**—त्यांत बोध घेण्यासारखं असतं कांहीं तरी.

**कृष्णाबाई**—खरं बोलण्यापासून नेहमीं फायदा होत असतो. खरं आहे का हें? ( मुली 'हो' म्हणतात )

**शोभनाबाई**—नेहमींच नाहीं कांहीं. एखाद वेळ खोटं बोलूनसुद्धां फायदा होतो.

**नलिनी**—फायदा होतो. पण खोटं बोलण्याचं पाप पदरीं पडतं. तेव्हां खरं सांगणंच योग्य.

**कृष्णाबाई**—माळी असतांना तुम्ही स्वतः बागेचं काम कां करतां?

**शालन**—आम्हांला शिक्षण मिळतं.

**कृष्णाबाई**—पुस्तकांतून नाहीं वाटतं समजत?

**नलिनी**—समजतं. तरी पण इथं प्रत्यक्ष प्रयोग केल्यामुळं आम्हांला जास्त माहिती मिळते.

**शोभनाबाई**—इतक्या सगळ्या भानगडी करून अभ्यासाला वेळ तरी कसा मिळतो ?

**वासंती**—मिळतो तर ! सकाळीं व्यायाम झाल्यानंतर दोन तास आम्ही अभ्यास करतों. शिवाय सायंकाळीं जेवण झाल्यावर एकतास नुसतं वाचन.

**शोभनाबाई**—व्यायाम घेतां तुम्ही ? इतका धुडगुस घातल्यानंतर व्यायामाची काय आवश्यकता ?

**नलिनी**—आहे तर ! शरीराची योग्यप्रकारें वाढ होऊन तें निरोगी राखण्याकरितां नियमित व्यायाम अवश्य करायला पाहिजे.

**कृष्णाबाई**—पण स्त्रियांना व्यायामाची जरूरीच काय मुळीं ?

**शालन**—कां बरं ! स्वतःचं संरक्षण करण्याइतकी ताकद प्रत्येकाच्या मनगटांत असलीच पाहिजे. मग ती स्त्री असो कीं पुरुष असो.

**शोभनाबाई**—( उठून शाबासकी देते.) शाब्बास ! खरं आहे तुझं म्हणणं ! व्यायामाचं खरं महत्व तुम्हांला अचलाबाईनीं पटवलेलं आहे यांत मुळींच शंका नाहीं. अचलाबाई, आपल्या शिक्षणाबद्दल माझा अगदीं गैरसमज झाला होता.

**पद ४ थें.**

**फुलवी समुदित हृदयाला । साहि न कां ही जगताला ॥ ध्रु. ॥**
**प्रेमळ भावा बाल जीवना । बोल मोहना । मम बोध मनीं ठसला ॥१॥**

पण या ठिकाणीं मला सत्य तेंच मूर्त स्वरुपांत दिसून आलं. आपला मनमिळाऊपणा, मुलींचीं मनं आकर्षित करण्याची कला आणि शिक्षण देण्याची हातोटी खरोखरच अवर्णनीय आहे. विहारांत शिक्षण घेणाऱ्या मुलींची चौकसबुद्धि, प्रगल्भ विचार, त्यांचा बहुश्रुतपणा वाखाणण्यासारखा आहे.

**सरलाबाई**—पण हें प्रत्यक्ष अनुभवाला आलं म्हणूनच आपला गैरसमज दूर झाला. म्हणून नेहमीं मतं ठरवितांना गोष्टी प्रथम पहाव्या लागतात. वरवर पाहून मतं देणाऱ्यांचीं मनं फोल ठरल्याशिवाय रहात नाहींत ( घंटा वाजते. )

**शोभनाबाई**—ही कसली घंटा ? रात्रीचे वर्ग असतात वाटतं तुमच्या इथं ?

**अचला**—नाहीं. ही हॉस्टेलची घंटा आहे. ही घंटा झाली कीं मुलींनीं पंधरा मिनिटांच्या आंत ' डायनिंग हॉल ' मध्यें जमायचं.

**सरलाबाई**—बरं आहे अचलाबाई, येतों आम्हीं आतां.

**शोभनाबाई**--बरं पण आम्हांला एखादं गाणं म्हणून दाखवणार का शालन ?

**शालन**—हो, न म्हणायला काय झालं. आम्हांला इतकीं छान छान गाणीं येतात कीं तुम्ही ऐकतच रहाल.

**शोभनाबाई**--असं ? मग आम्ही ऐकणारच. एक म्हणा पाहूं.

**शालन**—ऐका तर मग. ( मुली गाणें म्हणतात. )

### पद ५ वें.

**माझी लहानी चांगुणा । कवनीं गाऊं छान ग !**
**घरिं खेळा माणिक मोतीं । कारिं सागरगोटे भिकार ग !**
**खेळाया घरिं नंदा कुंदा । परी आवडे ठकू गोदा !**
**शाळेच्या या दुष्ट संगतीं । जडले इजला नष्ट ढंगहीं !**
**घोर लागला थोर मनाला । उपाय सांगा कोणी मजला !**
**माझ्या लहानीला गुणा । लावील बाई कोण ग ?**

**शोभनाबाई**—कुणी शिकवलं ग हें गाणं ?

**शालन**—गाणं बसवलं बाईनीं. कसं काय आहे ?

**शोभनाबाई**—छान आहे. येतों आम्ही आतां. आपला विनाकारण वेळ घेतला.

**अचला**—आमचाही खेळच चालला होता, त्यांत वेळ कसचा घेतलांत तुम्हीं. उलट विहाराची खरी स्थिति कळून आली. ( त्या जायला निघतात. अचला व मुली त्यांना पोंचवायला जातात. )

**कृष्णाबाई**--( संतापानें ) करायला गेलें एक पण झालं भलतंच. हरकत नाही. या सरलेनं चोंबडेपणा केला. पण अचले, अशी हुरळून जाऊं नकोस. ज्या शोभनाबाईनीं तुला आज डोक्यावर घेतली, तुझं कोडकौतुक केलं, त्याच शोभनाबाईकडून तुझा नक्षा न उतरवीन तर नांवाची कृष्णाबाईच नव्हे. ( जाते. )

[ पडदा पडतो. ]

# अंक दुसरा.

[ कन्याविहारांतील अचलेची खोली. सामान व्यवस्थित लावलेलें—डाव्या बाजूला टेबल, त्यावर लेखन साहित्य, कांहीं पुस्तकें—टेबलाच्या वरील बाजूस पुस्तकांचें छोटें कपाट—उजव्या कोपऱ्यांत कॉट—मधोमध एक छोटेसें पण साधें टीपॉय—त्यावर पुष्पगुच्छ—बाजूला खुर्च्या—भिंतीवर महर्षी अण्णासाहेब कर्वे, मिसेस ॲनीबेझंट, नामदार गोखले, रविंद्रनाथ टागोर वगैरे थोर व्यक्तींचीं छायाचित्रें—अचला प्रवेश करते. तिच्या हातांत दोन नुकतींच आलेलीं पत्रें असतात.]

**अचला**—हें रावसाहेबांचं पत्र ! यांत प्रशंसा असणारच असणार. आणि हें दुसरं ! आश्चर्य आहे ! शोभनाबाईंचं पत्र मला यावं ही खरोखरच आश्चर्याची गोष्ट आहे. काय असावं बरं या पत्रांत ? कांहीं का असेना वाचून तर पहावं. पण अगोदर कोणतं वाचावं ? हें कीं हें ? कोडंच आहे बाई ! आजपर्यंत इतकीं पत्रं आलीं पण आजच्यासारखं मन द्विधा कधींच झालं नव्हतं. वाचावं रावसाहेबांचंच. त्यांत माझ्या कार्याबद्दल प्रशंसोद्गारच मला वाचायला मिळतील. पण शोभनाबाईंच्या पत्रांत काय असेल ? त्यांचं हें पहिलंच पत्र आहे. त्यांचं पत्र झालेल्या ग्रहाला अनुकूल असेल का ? का वाटेंत तोही बदलला ? आणि तसं झालंच तर मात्र पत्रांत शोभाच असायची. मोठीं माणसं हीं ! केव्हां लहर फिरेल नेम नाहीं. मग कोणतं वाचावं प्रथम ! हें कीं हें ? आधीं कडू का गोड ? रावसाहेबांचं स्तुतिवर्षावाचं पत्र वाचल्यानंतर शोभनाबाईंच्या पत्रांतील कटु बोलानं माझ्या मनाला क्लेश होतील. पण दुःखानंतरच सुखोपभोगाची खरी किंमत जाणवते माणसाला. तेव्हां शोभनाबाईंचंच पत्र वाचावं आधीं. ( पत्र वाचते. वाचतांना चेहऱ्यावर आश्चर्य व आनंद हीं दिसूं लागतात. हंसते. ) माझा तर्क सपशेल चुकला म्हणायचा. पण शोभनाबाईंचंच का पत्र आहे हें ! शोभनाबाई, अखेर तुम्हांला माझीं मतं पटलीं म्हणायचीं ! तुमच्या या पत्रानं माझ्या हृदयांत आनंदोर्मि उसळूं लागल्या आहेत. आनंद कां होणार नाहीं ? प्रतिपक्षावर विजय मिळवल्यानंतर हृदय आनंदानं भरून आल्याशिवाय कसं राहील ! आतां रावसाहेबांचं पत्र. माझा

हाही तर्क चुकणार नाहीं ना ? शोभनाबाईंच्या पत्रानं माझी फसवणूक केली, तशी या पत्रानं—छे ! भलतीच शंका मनांत डोकाऊ लागली. 'मन चिंती तें वैरी न चिंतीं ' हेंच खरं. नाहींतर ज्या रावसाहेबांनीं माझ्या शाळेवर प्रेम केलं, संस्थेला उर्जितावस्थेला आणण्याच्या खटपटींत मला बहुमोल सहाय्य केलं, त्यांच्या पत्रांत माझ्याबद्दल उणा अधिक शब्द लिहिला जाईल हें संभवतं तरी कसं ! आतां विचारांत वेळ न घालवतां मनाचा हिय्या करून पत्र वाचलंच पाहिजे. ( वाचते. आनंदित होते. ) रावसाहेब, आज आपण आपल्या दानशौर्यावर कळस चढवलांत. माझ्या संस्थेला ५००० रुपयांची देणगी आणि प्रशस्तिपत्र पाठवून आपण मला कायमची ऋणी करून ठेवली आहे. आपल्या या उपकाराबद्दल मी कशी उतराई होऊं ? ( कृष्णाबाई येते. पर्स टेबलावर ठेऊन हळूंच तिच्या पाठीमागें येऊन उभी राहते. ) आजचा दिवस मोठ्या भाग्याचा आहे. आज माझ्या आनंदाला पारावार नाहीं. जाऊं का मोठ्या बाईंच्याकडे हीं पत्रं घेऊन ? बाई मला शाबासकी देतील—

**कृष्णाबाई**—( पाठीवर थाप मारते. ) आज स्वारी अगदीं बेहोष ?

**अचला**—कोण कृष्णाबाई ? (मिठी मारते.) बऱ्या आलांत ! आधीं बसा इथं.

**कृष्णाबाई**—एवढा कसला आनंद झाला आहे बाई ? आम्हांला कळेल का कारण ?

**अचला**—हो, हो ! त्याकरतां तर तुम्हांला मिठी मारली. पत्रंच तशीं आलीं आहेत आज. हें पहा. ( शोभनाबाईचें पत्र देते. )

**कृष्णाबाई**—( पहाते. ) शोभनाबाईंचें पत्र ? काय म्हणताहेत ? ( वाचते. रागावते. )

**अचला**—बाई, तुम्हांला राग आलेला दिसतोय.

**कृष्णाबाई**—कां येणार नाहीं राग ?

**अचला**—पण राग कुणाचा आला तुम्हांला ? शोभनाबाईंचा ?

**कृष्णाबाई**—हो, हो ! शोभनाबाईंचाच. श्रीमंत माणसं हीं. अगदीं हलक्या कानाची असतात. ज्यानं जशीं वळवावी तशी वळायचीं ती. यांचं ठाम मत नसायचंच मुळीं !

**अचला**—मला नाहीं समजला आपल्या बोलण्याचा अर्थ.

**कृष्णाबाई**—कसा समजेल तो ? आणि नकोही समजायला, बरं पण दुसरीं पत्रं नाहीं दाखवलीत ?

**अचला**—दुसरीं पत्रं ? तुम्हांला कसं कळलं तें ?

**कृष्णाबाई**—तुम्ही पत्रं आलीं असं म्हणाला होतात. आम्हांला दाखवायचीं नसतील तर नका बाई दाखवूं ?

**अचला**—काय भलतीच शंका ही बाई ! तुमच्याशीं मी भेदभाव करीन का ? आपण अगदीं—

**कृष्णाबाई**—ही प्रस्तावना पुरे ! पत्रं दाखवतां का ?

**अचला**—हें पहा ना ? दोनंच आलीं आहेत. ( पत्रा देते. )

**कृष्णाबाई**—( वाचते-संतापते ) अचलाबाई, तरीच तुम्ही पत्रा द्यायला मागं पुढं पहात होतात ! कुणाचं आहे हें पत्रा ?

**अचला**—कुणाचं म्हणजे ? रावसाहेबांचं. खालची सही नाहीं वाटतं पाहिलीत ?

**कृष्णाबाई**—( संतापानें ) सही पाहिली अन् पत्राही वाचलं. अचलाबाई? या पत्रांन तुम्ही इतकं आनंदानं नाचायला लागावं याचं मला मोठं नवल वाटतं !

**अचला**—नवल वाटतं ? बाई, तुम्हांला नवल वाटतं याचं मलाही पण नवल वाटतं. स्वतःच्या तपश्चर्येचं फळ—

**कृष्णाबाई**—पण असलं फळ लाभायला तपश्चर्येची काय जरुरी ? इथं केवळ चर्येची लाजरी. 'लाजरी नजर लावील जगाला नजर !'

**अचला**—आज आपल्या संस्थेला रावसाहेबांनीं मोठी देणगी दिली. प्रशस्तिपत्रा पाठवून संस्थेचा आणि त्याबरोबरच माझा गौरव केला. तर बाई, हृदय आनंदानं भरून येऊन डोळ्यांतून आनंदाश्रू वाहिल्या शिवाय कसे राहतील ?

**कृष्णाबाई**—हे आनंदाश्रूच तुमच्या डोळ्यांतून दुःखाश्र वहायला कारण होतील हें पक्कं लक्षांत ठेवा. अचलाबाई, पुरुषांचीं पत्रं वाचून अशा ठिकाणीं, या पवित्र विद्यामंदिरांत नाचायला तुम्हांला कांहींच कसं वाटत नाहीं ?

**अचला**—मला काय वाटायचं त्यांत ? आणि बाई, तुम्हांला तरी कां वाटावं ? शिवाय रावसाहेबांचं पत्र वाचून विद्यामंदिराची शिस्त कशी काय

बिघडली ? आपल्या कन्याविहारांत आजपर्यंत अनेक पुरुषांचीं पत्रं आलीं आहेत. आपण सर्वांनीं तीं वाचलीं आहेत. पण आपल्याकडून शिस्तभंग झाला असं आपल्याला मुळींच वाटलं नाहीं. मग रावसाहेबांच्या पत्रानं शिस्तभंग कसा काय झाला ?

**कृष्णाबाई**—शाळेची पत्रं आणि वैयक्तिक पत्रं यांत कांहींच का फरक नाहीं ? रावसाहेबांचं पत्र हें तुम्हांला आलेलं पत्र आहे. अर्थात तें खाजगी स्वरूपाचं आहे. कन्याविहारांतील शिक्षकिणींचा असला हा पत्रव्यवहार जगाला कळला तर अचलाबाई, तुमच्या आमच्या अब्रूबरोबरच संस्थेच्या अब्रूचं खोबरं झाल्याशिवाय खास राहणार नाहीं.

**अचला**—( हंसते. ) बाई, किती कोते विचार आहेत तुमचे ? आतांची तुमची कल्पना ऐकून मला आपली कींव करावीशी वाटते. पत्र माझ्या नांवानं आलं म्हणून तें खाजगी स्वरूपाचं आहे असं तुम्ही कसं म्हणता ? आपल्या संस्थेचे आपण घटक आहोंत. अर्थात् आपलीं सर्वच पत्रं खाजगी स्वरूपाची कशी असतील ! रावसाहेबांचा आणि संस्थेचा संबंध लक्षांत घेतां त्यांनीं मला पाठविलेलं प्रशस्तिपत्र पाहून आपण इतकं भेदरून जाण्याचं कांहींच कारण नाहीं.

**कृष्णाबाई**—त्यांचा संस्थेशीं असलेला संबंध लक्षांत घेऊनच मी बोलतें आहे. आज इतक्या वर्षांत रावसाहेबांच्या पिशवीचं तोंड कधीं इतकं सैल सुटलं नव्हतं पण तुमच्याशीं संबंध येतांच त्यांना एवढी कळकळ वाटावी आणि संस्थेला ५००० रुपयांची देणगी मिळावी ही खरोखरच विचार करण्यासारखी गोष्ट आहे. आपुलकीच्या भावना उत्पन्न झाल्याशिवाय का असल्या देणग्या मिळायला बसल्या आहेत ! अचलाबाई, मी खात्रीनं सांगतें कीं या पत्रानं तुम्ही गोत्यांत याल. माझं ऐकायचं असेल तर हें पत्र इथल्या इथंच दडपून टाका. आपल्या रहस्याची मजल यापुढं न जाऊं देणं तुमच्या आणि संस्थेच्या हिताचं आहे असं माझं तुम्हांला आग्रहाचं सांगणं आहे.

**अचला**—रहस्य ? कसलं रहस्य ? बाई, तुमच्या मत्सरी मनाला सारींच रहस्यं दिसायची. तसाच प्रसंग आला तर मी खंबीर आहे जाब द्यायला.

**कृष्णाबाई**—ठीक आहे तर ! तुम्ही आपले थेर असेच चालू ठेवा. मला काय करायचं तुमच्याशीं ? पण लक्षांत ठेवा तुमच्या खंबीरपणाची भंबेरी न उडवीन तर नांवाची कृष्णाबाईच नव्हे ! ( पाकीटांतील रावसाहेबांचें पत्र आपल्याजवळ ठेवून पाकीट तिच्या अंगावर फेंकून निघून जाते. )

**अचला**—काय जगाची रीत आहे पहा ! स्वतःच्या कर्तबगारीचं फळ मिळालं असतां मनुष्याला आनंद होऊंच नये किंवा झालाच तर त्याचं त्यानं चारचौघांत प्रदर्शनही करूं नये ! कृष्णाबाईंनीं आजपर्यंत शाळेसाठीं पैसा जमवला नसेल का ? हें शक्यच नाहीं. सार्वजनिक संस्थांना धनिकांचं पाठबळ आणि सहानुभूति असल्याशिवाय त्या सुरळितपणं चालणं किंवा सुस्थितींत राहणं अशक्यच असतं. मग माझ्यामुळं शाळेला देणगी मिळाली तर कृष्णाबाईंना राग येण्याचं कारण ? ( विचार करते. ) त्यांना माझ्याबद्दल वैषम्य वाटत असेल का ? हो. असंच असलं पाहिजे. मी संस्थेंत येऊन काम करूं लागतांच मुलींना जिव्हाळा वाटूं लागला, इतर सहशिक्षकिणीही माझ्याशीं आपलेपणानं वागूं लागल्या, संस्थेंत माझ्या कार्याचा बोलबाला होऊं लागला. त्यामुळंच त्या अलिकडं फारच मत्सरी बनल्या आहेत. एकंदरींत झाला प्रकार ठीक झाला नाहीं. रावसाहेब आणि शोभनाबाईच्या पत्रांनीं मला आनंद होत आहे आणि कृष्णाबाईंना माझ्याविषयीं वाटणारा हेवा पाहून तर दुणावला आहे. शोभनाईचं कलुषित मन मला निवळवता आलं तसंच कृष्णाबाईच्या मनांतलं मत्सराचं किल्मिष मला काढून टाकतां येणार नाहीं का ? ( सरलाबाई येते. )

**सरलाबाई**—देव आहे का मोकळा ! भक्ताचं नशीब मोठं जोरावर आहे म्हणायचं !

**अचला**—मी देव ? हा काय बाई नवीन शोध !

**सरलाबाई**—हा शोध नाहीं. माझं म्हणणं अगदीं बालबोध आहे.

**अचला**—पण बालमनाला त्याचा गूढार्थ आकलन होणार नाहीं.

**सरलाबाई**—अर्थ आकलन होत नसेल, पण आकर्षण मात्र होतं.

**अचला**—असं ! असं ! मुलीं जवळ नाहींत म्हणतां होय ?

**सरलाबाई**—आतां आला माझा अर्थ ध्यानांत.

**अचला**—कळलं बरं. पण एवढ्या घाईनंशा आलांत ! आनंदाच्या बातमीनं वारा खाल्ला वाटतं ?

**सरलाबाई**—वारा खाल्ला नाहीं. पण एका माणसानं वारा प्याला आहे खास !

**अचला**—करा बाई थट्टा !

**सरलाबाई**—केव्हां केव्हां थट्टेलासुद्धां मोल येतं.

**अचला**—पण मोलाच्या थट्टेला बोल अमोलच. मग सांगा ना, कळली ना आनंदाची बातमी ?

**सरलाबाई**—छे ग ! कसली बातमी ?

**अचला**—अशानं मी फसायची नाहीं हं ! सांगा बरं बातमी कळली कीं नाहीं ?

**सरलाबाई**—अग नाहीं, नाहीं, नाहीं !

**अचला**—होय, होय, होय ! कळलीच आहे तुम्हांला बातमी. कळलीना ?

**सरलाबाई**—हो !

**अचला**—आतां कशा ताळ्यावर आलांत ! कोणती बातमी ?

**सरलाबाई**—एका नवीन ग्रहाचा शोध लागला !

**अचला**—तो कोणता ?

**सरलाबाई**—आग्रह ! ( दोघी हंसतात. )

**अचला**—बरंच वेड पांघरतां येतं हं तुम्हांला !

**सरलाबाई**—थंडीच्या दिवसांत पांघरूण घ्यावंच लागतं. बरं, काय नवीन खबर आहे ? कळू दे तर आधीं.

**अचला**—जशी कांहीं आपल्याला कळलीच नाहीं ! मी तर म्हणतें कीं बातमी कळली म्हणून तर स्वारी इकडं वळली.

**सरलाबाई**—आणि गुलाबकळी खुलली असंच कीं नाहीं ? बरं. आतां थट्टा राहूं दे. सांगतेस ना बातमी !

**अचला**—बसा तर आधीं मग सांगतें. ( बसतात. ) शोभनाबाईंचं मला पत्र आलं आहे. त्यांत माझी प्रशंसा आहे. अनुकूल ग्रह झाला आहे त्यांचा.

**सरलाबाई**—तुझ्या पत्रिकेंत तर सगळेच ग्रह अनुकूल आहेत तुला. हीच का आनंदाची बातमी ? ही तर शिळी बातमी.

**अचला**—शिळी ! आत्तांच तर मला समजली. तासभरसुद्धां झाला नसेल. इतक्यांत कशी होईल शिळी ?

**सरलाबाई**—खुळी आहेस झालं ! त्यांचा अनुकूल ग्रह झाला हें त्यांनीं मला कधींच सांगितलं. फक्त तुला पत्रानं आज कळवलं.

**अचला**—पण खरी आनंदाची बातमी तर निराळीच आहे. ती कुठं आहे तुम्हांला माहीत !

**सरलाबाई**—आणखी दुसरी बातमी ? कोणती बरं ती ?

**अचला**—अहो रावसाहेबांनीं ५००० रुपयांच्या देणगीचा चेक आणि मला एक प्रशस्तिपत्र पाठवलं आहे.

**सरलाबाई**—आहे बाई ! आमच्या शाळेचं भाग्य थोर म्हणूनच असलं हें रत्न आम्हांला लाभलं ! बरं पण पाहूं बरं तें पत्र.

**अचला**—पण आधीं सांगा तर खरं काय असेल पत्रांत ?

**सरलाबाई**—पत्रं वाचून झाली तरी स्तुतिस्तोत्रं पुन्हां ऐकाविशीं वाटतात होय ?

**अचला**—कां वाटूं नये ? मनुष्यप्राणी हा स्तुतिप्रियच आहे. फार काय देवालासुद्धां भक्तांकडून एक सारखे स्तुतीचे गोडवे ऐकावेसे वाटतात. मग मी तर काय यःकश्चित मनुष्य ! मग सांगा बरं काय असेल पत्रांत ?

**सरलाबाई**—आमच्या कन्याविहारांत अचलाबाई नांवाची एक अध्यापिका आहे. B. T. होऊन आली आहे. कुठं वशिला लावला होता कुणास ठाऊक ! ती आल्यापासून शाळेची भरभराट होत गेली. शिक्षणप्रेमी जनतेकडून तिचं कौतुक होऊं लागलं. कांहींचे प्रतिकूल ग्रह अनुकूल झाले. आणि एका मोठ्या धनिकाकडून तिच्या प्रशंसेनं भरलेलं एक प्रशस्तिपत्र आणि ५००० रुपयांचा चेक मिळाला. झालं का आतां समाधान ? पाहूं बरं तीं पत्रं. ( अचला दोन्ही पाकीटें देते. ती शोभनाबाईंचें पत्र वाचते. ) शोभनाबाईंनीं अगदीं खुल्या अंतःकरणानं लिहिलं आहे पत्र ? कांहीं आडपडदा ठेवला नाहीं. (रावसाहेबांचें पाकीट उघडते त्यांत चेकच असतो तो वाचते. अचलेकडे पाहते.) अस्सं ! अशी मखलाशी केलीस काय ? इतकं कांहीं लपवून ठेवायला नको आहे.

**अचला**—कांहीं तरीच बोलता झालं ! काय लपवून ठेवलं मी ?

**सरलाबाई**—रावसाहेबांचं पत्र ! रावसाहेबांचं पत्र हवंय मला.

**अचला**—मग तें पाकीटांतच आहे.

**सरलाबाई**—पाकीटांत फक्त चेक आहे.

**अचला**—काय ? पाकीटांत पत्र नाहीं म्हणता ? पाहूं ? ( पहाते ) अय्या ! खरंच कुठं गेलं तें ? ( शोधते. ) मी तर हाललेंही नाहीं जागची. मग नाहींस कसं झालं ?

**सरलाबाई**— वा ! वा ! घाबरण्याचं ॲक्टींग तर कमालीचं साधलं बाई ! आतां तुला नाटकांत काम करायला हरकत नाहीं. आपल्या भूमिकेशीं समरस होण्याची कला तुला उत्तम साधली आहे !

**अचला**—आतां थट्टा पुरे करतां का सरलाबाई ? मी कांहीं पत्र लपवून ठेवलं नाहीं. शोधा बरं इथंच.

**सरलाबाई**—काय चलाखी करतेस पण !

**अचला**—छे, हो ! असं काय बोलतां तुम्ही ? पत्र खरंच नाहींसं झालं.

**सरलाबाई**—अग मग चेकच तुला पत्र म्हणून भासलं असेल. ' मनीं वसे तें स्वप्नीं दिसे ' म्हणतात तेंच खरं.

**अचला**—नाहीं हो सरलाबाई, चेकबरोबर पत्र होतंच. मी तें वाचलंय.

**सरलाबाई**—मग जाईल कुठं तें ? मुली आल्या होत्या का इथं ?

**अचला**—कोणी आलं नव्हतं.

**सरलाबाई**—मग पत्र जाईल कसं ? तूं वाचून कुठं ठेवलंस बरं तें ?

**अचला**—हें माहित असतं तर शोधाशोध करायच कारण पडलं असतं का ? आतां मला कांहीं विचारूं नका. शोधा पाहूं इथंच. ( शोधते. सरलाबाईला टेबलावर कृष्णाबाईची पर्स दिसते. )

**सरलाबाई**—अचले, ही कृष्णाबाईची पर्स इथं तुझ्या टेबलावर कशी ?

**अचला**—अय्या खरंच ! कृष्णाबाई आल्या होत्या इथं. मी विसरलेंच तुम्हांला सांगायला.

**सरलाबाई**—केव्हां ?

**अचला**—तुम्ही येण्याच्या अगोदर. त्या गेल्या अन् तुम्ही आलांत.

**सरलाबाई**—अस्सं ! त्यांना दाखवलीं होतीस का पत्रं ?

**अचला**—हो ! त्यांनीं वाचलीं सुद्धां तीं.

**सरलाबाई**—मग काय म्हणाल्या त्या ?

**अचला**—त्यांनीं विपर्यास केला त्या पत्राचा.

**सरलाबाई**—कोणत्या पत्राचा ?

**अचला**—रावसाहेबांच्या. त्यांनीं तें पत्र वाचलं मात्र, आणि माझ्यावर भलभलते आरोप करायला सुरवात केली. माझ्याकडून शिस्तभंग झाला असं त्यांचं म्हणणं.

**सरलाबाई**—अलिकडे शिस्तभंगाचं फारच प्रस्थ माजलं आहे. जरा कुणाचा उत्कर्ष होऊं लागला, समाजांत त्याला मानाचं स्थान प्राप्त होऊं लागलं कीं, कृष्णाबाईसारखीं मत्सरी माणसं त्याच्यावर शिस्तभंगाचा आरोप करून त्याला नेस्तनाबूद करायला कमी करीत नाहीत. अचले, तूं मला बहिणीसारखी आहेस. जोपर्यंत मी तुझ्या पाठीशीं आहे तोपर्यंत अशा कृष्णाबाईंनीं तुझ्या विरुद्ध कितीही काहूर माजवलं तरी त्याला मुळींच भीक घालूं नकोस. तुझं पत्र अगदीं सुरक्षित आहे. कांहीं काळजी करूं नकोस.

**अचला**—सुरक्षित आहे ? कुठं आहे तें ? द्या ना मग. इतका वेळ उगीचच गम्मत केलीत आणि मला घाबरवून सोडलंत. तरी म्हटलं कीं पत्र इथून नाहींसं कसं होईल ! मी नाहीं आतां तुमच्याशीं बोलत जा.

**सरलाबाई**—शाबास ! आमच्यावरच आळ आणलास ! शहाण्या माणसानं तुझ्या भानगडींत पडूं नये हेंच खरं ग बाई !

**अचला**—म्हणजे काय बाई ! आतांच पत्र सुरक्षित आहे असं तुम्हीच म्हणालांत ना ?

**सरलाबाई**—म्हणालांत कां ? अजूनही तसंच म्हणतें कीं तुझं पत्र अगदीं सुरक्षित आहे. बंदोबस्तांत आहे.

**अचला**—ही कसली जीव घेण्याची थट्टा ? सुरक्षित आहे तर द्या ना मग ? कुठं आहे तें ?

**सरलाबाई**—अस्सं विचार. नुसता त्रागा करून काय होतंय ! तुझं पत्र आहे कृष्णाबाईजवळ.

**अचला**—( दचकते ) कृष्णाबाईजवळ ? त्यांनीं कसं नेलं तें ? मला कसं कळलं नाहीं ? आश्चर्य आहे !

**सरलाबाई**—आश्चर्य कसलं ? तुझी लागली आहे ब्रह्मानंदी टाळी ! तुला स्वतःला नेलं असतं तरी समजलं नसतं. मग पत्र नेल्याचं तर काय !

**अचला**—कृष्णाबाईनीं पत्र नेलं ? तुम्हांला कसं कळलं ?

**सरलाबाई**—तूं सांगितलेल्या माहितीवरुनच. कृष्णाबाई खेरीज पत्र गेलंच नाहीं अशी माझी पूर्ण खात्री आहे.

**अचला**—कां बरं नेलं असावं त्यांनीं ? कदाचित् माझ्या विरुद्ध—

**सरलाबाई**—लागलीस विचार करायला. अग त्याचं कारण अगदीं उघड आहे. तुझ्या स्तुतिबरोबरच त्यांत पर्यायानं आमचीहि स्तुति आलीच. शिवाय त्यांत चेकचा संबंध आहे. तेव्हां नेलं असेल दप्तरीं लावायला.

**अचला**—नाहीं. सरलाबाई, तुमच्या सांगण्यानं माझं समाधान होत नाहीं. तुमचे बोल आणि मन एक नाहींत. तुम्ही माझी वंचना करीत आहांत.

**सरलाबाई**—अचले, मी तुझी वंचना केली नाहीं आणि करणारही नाही. तुला खात्रीच करून घ्यायची असेल तर तें पत्रच मी तुला आणून देतें. मग तर झालं ?

**अचला**—तसं कराल तर माझ्यावर फार उपकार होतील आपले.

**सरलाबाई**—पण विचारानं तूं अशी अस्वस्थ होऊं नकोस. (मुली फुलांच्या परड्या घेऊन येतात. ) तसं कशाला ? हा पहा तुझा भक्तगणच हजर झाला. आतां स्वाभाविकच विसर पडेल तुला. येतें बरं मी आतां. ( निघते. )

**शालन**—बाई, जरा थांबा. ( सरलाबाई परत येतात. )

**अचला**—कां ? जात होतात ना ?

**सरलाबाई**—पण यांनीं थांबवलं ना ? यांचं मन मोडून मी कशी जाऊं ? गेलें तर तूंच दोष द्यायचीस.

**अचला**—आतां पटलं ना माझं म्हणणं ? मी तरी यांच्यात कां रमतें ? यांचीं बालमनं, विशुद्ध अंतःकरणं मनाला मोहिनी घालतात. या जवळ आल्या कीं मी देहभान विसरतें—तादात्म्य पावतें—मला स्वर्गीय सुखाचा लाभ होतो. पण लोक माझ्या वागण्याचा विपर्यास करतात. माझ्या वागण्यामुळं शाळेची

शिस्त शिथील होते, दर्जा कमी होतो, शैक्षणीक महत्व कमी होतं. अशा प्रकारचे नानातऱ्हेचे आरोप माझ्यावर लादले जातात.

**सरलाबाई**—पहा पुन्हां तुझं विचारचक्र सुरू झालं. तुला अशा स्थितीत पाहून या चिमण्या जिवांचीं मुखकमलं कशी कोमेजून गेलीं आहेत पहा. तुला पाहिलं कीं नाचाबागडायला लागणारीं हीं फुलपांखरं कशी स्तब्ध झालीं आहेत ! मोठ्या उत्सुकतेनं त्या आल्या. पण तुला विचार करतांना पाहून—

**अचला**—खरंच मला भानच राहिलं नाहीं.

**सरलाबाई**—ही वानरसेना कां आली इथं ?

**नलिनी**—आम्हीं बाईंना फुलं द्यायला आलों.

**शालन**—आज आपल्या बागेंत कितीतरी गुलाब फुलले आहेत.

**सरलाबाई**—असं होय ? आजचा दिवसच तसा आहे. बागेंतलीं फुलंच काय पण विहारांतील साऱ्यांच्या कळ्या खुलल्या आहेत आज. इतकंच काय पण इथंसुद्धां गुलाब फुलले आहेत.

**मुली**—इथं ? बाईंच्या खोलींत ?

**सरलाबाई**—तुम्हांला नाहीं दिसत ! पहा बरं नीट. ( अचलेकडे पहाण्यास खुणवते. )

**अचला**—तुमची ही अलंकारिक भाषा त्यांना काय कळणार ?

**सरलाबाई**—अग मुलांनाच त्याचा खरा अर्थ जाणता येतो. दिसले का गुलाब ?

**नलिनी**—दिसले बरं. पण कारण नाहीं कळलं.

**शालन**—मला माहित आहे कारण.

**मुली**—मग सांगा ना तें.

**शालन**—हात्तीच्या ! अग आपण आलों म्हणून. ( सरलाबाईस ) हो ना बाई ! ओळखलं कीं नाहीं बरोबर ?

**सरलाबाई**—ओळखलंस. पण अगदीं बरोबर नाहीं. तुमच्या येण्यामुळं आनंद झाला हें खरं आहे. पण आणखी एक कारण आहे.

**शालन**—तें कोणतं ? सांगा ना बाई.

**अचला**—आपल्या शाळेला कीं नाहीं रावसाहेबाकडून ५००० रु.ची देणगी मिळाली आहे.

ग्रं. क्र. ... 9823

**सरलाबाई**—शिवाय शोभनाबाईंचं आणि रावसाहेबांचं अशीं पत्रं आलीं आहेत. तुमच्या बाईंची खूप स्तुति केली आहे पत्रांत. बरं. आतां आम्हांला गाणं म्हणून दाखवा एक.

**मीनाक्षी**—आणि मग बाई म्हणतील गाणं ?

**वासंती**—बाई, म्हणाना एक.

**अचला**—म्हणेन बरं.

**शालन**—म्हणेन नाहीं. म्हणतें म्हणा.

**अचला**—म्हणतें.

**शालन**—अय्या ! हें काय ! कराना सुरवात.

**अचला**—तूं म्हणालीस ना ' म्हणतें म्हणा ' म्हणून ' म्हणतें ' म्हटलं.

**किशोरी**—काय तरी बाई गम्मत करतात ! इश्श !

**अचला**—आतां कालचं ' ॲक्शन सॉंग ' म्हणून दाखवा बरं यांना. येत्या सम्मेलनांत म्हणायचं आहे तें. [ मुली एक ॲक्शसॉंग ( पद ६ वें. ) म्हणतात.]

**शालन**—बाई, चला आतां आमच्याबरोबर. आम्हांला मोठ्या बाईंना फुलं द्यायचीं आहेत.

**वासंती**—आणि—आणि—

**अचला**—थांबलीस का ! सरलाबाईंना द्यायचीं आहेत ना ?

**सरलाबाई**—मला द्यायला त्या एवढ्या अडखळणार नाहींत. मी समजलें त्या कां अडखळल्या तें. काय ग, समजलें ना मीं ?

**अचला**—मला नाहीं समजत या कोडभाषेचा अर्थ.

**सरलाबाई**—कोडभाषा आणि खुली भाषा समजण्याच्या स्थितींतच नाहींस तूं. अग कृष्णाबाईंना.

**मीनाक्षी**—द्यायचीं ना फुलं त्यांना बाई ?

**अचला**—द्यायची तर अन् क्रमही सांगून ठेवतें. पहिल्यांदा मोठ्या बाई, नंतर कृष्णाबाई, मग या सरलाबाई आणि शेवटीं—

**सरलाबाई**—या छोट्या बाई. समजलं ना ?

**मुली**—अय्या ! छोट्या बाई ! ( हंसतात. )

**शालन**—बाई, मग चला आतां आमच्या बरोबर.

**अचला**—अग मी कशाला बरोबर ? तुम्हीच जा आणि देऊन या.

**नलिनी**—अं हं ! आम्हांला भीति वाटते कृष्णाबाईच्या खोलींत जायला.

**अचला**—भीति ! भीति वाटण्याचं कारण ? त्या कांहीं खात नाहींत तुम्हांला.

**शालन**—खाल्लं तर हरकत नाहीं. पण नुसतं तोडून टाकतात.

**मीनाक्षी**—आणि तुम्हांला खातील वाटतं त्या ?

**वासंती**—तें कांहीं नाहीं बाई. निदान मोठ्या बाईच्याकडं तरी तुम्ही आलंच पाहिजे आमच्याबरोबर.

**अचला**—त्यांच्याकडेसुद्धां मी कशाला बरोबर हवी तुम्हांला ?

**नलिनी**—आजच चला. पुन्हां नाहीं नेणार तुम्हांला.

**अचला**—बरं चला तर. सरलाबाई, भक्तांनीं हट्ट घेतला आहे. तो पुरवणं देवाचं कर्तव्यच आहे. तुम्हीही चला.

**सरलाबाई**—चांगली पुजा केल्यावरच देव प्रसन्न झाला. चला तर.

**अचला**—घ्या त्या परड्या फुलांच्या. ( सर्व मुली परड्या उचलतात. शालन स्वस्थ उभी रहाते. ) कां ग ? यायचं ना फुलं द्यायला ? मग घे ती परडी अन् चल आमच्याबरोबर.

**शालन**—बाई, तुम्ही आम्हांला चकवायला पहातां काय ?

**अचला**—म्हणजे मी नाहीं समजलें.

**शालन**—तुम्ही नाहींच समजणार. पण मी मात्र समजलें बरोबर.

**नलिनी**—हें काय ग शालन ? तुला यायचं कीं नाहीं ? नसेल यायचं तर आम्हीच जाऊं बाईना घेऊन. चला बाई.

**अचला**—पण ही काय म्हणते तें ऐकून तर घेऊं. हं काय शालन ?

**शालन**—जसं कांहीं तुमच्या लक्षांतच आलं नाहीं ना ? तुम्ही गाणं म्हणायचं कबूल केलं आहे. ( मुली 'अय्या खरंच' म्हणून परड्या खालीं ठेवतात. ) अन् तसंच निघालांत काय ? बरं कारण सांपडलं तुम्हांला ! ( मुलींना ) कां ग ? जा ना. जा आतां. तुम्हांला उशीर होईल. आतां कां ?

**अचला**—मोठी बिलंदर आहे ही चिमुरडी !

[ अचला एक भावगीत ( पद ७ वें ) म्हणते. मुली तल्लीन होतात. ]

[ पडदा पडतो. ]

# अंक तिसरा.

[ कृष्णाबाईची खोली—कोपऱ्यांत टेबल खुर्ची—त्याच्या बाजूलाच कपड्यांचे कपाट—उजव्या बाजूच्या कोपऱ्यांत कॉट—मध्यभागीं फॅशनेबल राउंडटेबल—त्यावर फ्लॉवर पॉट—सभोवतीं खुर्च्या—भिंतीवर कांहीं चित्रें. कृष्णाबाई रावसाहेबांचें पत्र वाचते आहे. ]

**कृष्णाबाई**—हं ! हं ! मनुष्य एखाद्याला चढवूं लागला कीं आपलं महत्व तो विसरून जातो. रावसाहेबांचंही असंच होतंय. ( पत्र वाचते. ) ‘ आपण आल्यापासून मुलींच्या शिक्षणांत कल्पनातीत सुधारणा झाली. ’ ही येण्यापूर्वी वर्गांत आम्ही सागरगोटेच खेळत असूं की नाहीं ! ( वाचते. ) ‘आपण अंगिकारलेलें पवित्र कार्य असेंच चालू ठेवावें. माझेंही आपल्याकडे पूर्ववत् लक्ष राहीलच. लक्ष लागलं म्हणूनच तर ही मनधरणी ! काय भाषा आहे पत्राची ! पत्र वाचतां क्षणींच अचलेच्या अंगाचा भडका उडायला पाहिजे होता. पण—पण काय ? तिला पत्राचा अर्थच समजला नसेल काय ? पुरुषांची जात ! पुरुषजातीची तिला अजून कल्पनाच नाहीं काय ? सदा फुलांत आणि मुलांत वावरणाऱ्या ह्या बाईला पुरुषजातीची कल्पना व्हावी तरी कशी ? काव्यांत शिरतांच मीही काव्यरसांत विरघळूं लागलें. स्वतःच्या शीलाशीं संबंध असतांही तो न समजणं—पण—पत्रांतल्या मजकुरानं तिला गुदगुल्या होऊं लागल्या ( विचार करते. ) त्यांत कांहींतरी रहस्य असलंच पाहिजे. बस्स ! ठरला निश्चय कायम ! ज्या पत्रानं अचलेला अस्मान ठेंगणं वाटूं लागलं त्याच पत्राच्या आधारानं मी तिला रौरवाची वाट दाखवीन तरच नांवाची कृष्णाबाई ! ( पत्र टेबलावर ठेवते—मुली गात येतात. ) का ग ? ( त्या थबकतात. ) कशाला आलांत इथं ? माझी खोली म्हणजे तुम्हांला स्टेज वाटलं होय ? बोलत कां नाहीं ?

**मीनाक्षी**—आम्हांला भीति वाटते तुमची.

**कृष्णाबाई**—भीति वाटते ? काय झालं भ्यायला ? मी काय राक्षसीण आहे कीं काय ?

**वासंती**—नाहीं. तुम्ही आमच्या बाई आहांत.

**किशोरी**—पण अचलाबाईसारख्या नाहीं तुम्हीं.

**कृष्णाबाई**—मग कशाला आलांत माझ्या इथं ?

**शालन**—तुम्हांला फुलं द्यायला. आज आपल्या बागेंत खूप फुलं फुललीं होतीं. आज सगळ्या बाईंना फुलं द्यायला येतील म्हणून आलों बाई तुमच्या इथं.

**कृष्णाबाई**—पण तुम्हांला कोणी सांगितलं तीं फुलं तोडायला ? बागेंतल्या फुलांना कोणीही हात लावायचा नाहीं, तीं तोडायचीं नाहींत अशी पाटी लावलेली आहे कीं नाहीं ? तुम्हीं कुणाच्या परवानगीनं फुलं तोडलींत ?

**नलिनी**—हीं शाळेंतल्या बागेंतलीं नाहींत. आम्ही तयार केलेल्या बागेंतलीं आहेत.

**कृष्णाबाई**—म्हणून काय झालं ? पाटी कशाला लावली आहे तिथं ?

**शालन**—पाटी बाहेरच्या लोकांकरितां आहे. आम्हीं या कन्याविहारांतल्याच. तेव्हां आम्ही नाहीं कुणाची परवानगी घेतली. शिवाय बाई आम्हांला कधींच रागवत नाहींत.

**वासंती**—बाई म्हणजे आमच्या बाई नव्हे हो ! मोठ्या बाई. त्या म्हणतात या फुलांवर मालकी आमचीच आहे. आणि आमच्या बागेंतच्या फुलांवर आमची मालकी आहेच आहे.

**कृष्णाबाई**—असं काय ? तुम्ही फारच शेफारत चाललांत. तुम्हांला मोठ्या बाईंच्याकडून चांगली शिक्षा करवतें आतां.

**मीनाक्षी**—आम्हीं आतांच त्यांच्याकडं जाऊन आलों. आम्ही त्यांना फुलं दिलीं, त्यांनीं आम्हांला शाबासकी दिली.

**कृष्णाबाई**—खूळ लागलं आहे मोठ्या बाईंना. या अचलेनं काय जादू केली आहे कळत नाहीं ! ( मुली एकमेकींना फुलें देण्याबद्दल खुणावतात. कोणी तयार होत नाहीं. शालन पुढें जाते. )

**शालन**—बाई, घ्या हीं फुलं ( पत्र दिसतें. ) हें काय ? हें तर आमच्या पपांचं पत्र ! आमच्या बाईंना आलेलं पत्र ? (कृष्णाबाई कावरी बावरी होते.) बाई, हें आमच्या बाईंचं पत्र इथं कसं राहिलं ? विसरल्या वाटतं त्या ? नेऊं का तें ?

**कृष्णाबाई**—चूप कारटें. जा बरं इथून तुम्हीं. ( पत्र पुस्तकांत ठेवते. )

**शालन**—पत्राचं राहूं दे. पण हीं फुलं तर घ्याल कीं नाहीं ?

**कृष्णाबाई**—( हात झिडकारते. ) हीं फुलं तुमच्या त्या अचलाबाईंच्या डोक्यावर घाला. पाहिजे तर याच्या माळा करून, तिला फुलानं मढवून गांवभर धिंड काढा तिची. खबरदार माझ्याशीं लगट केलीत तर. चला जा इथून. ( मुली एकमेकींकडे पाहातात. )

**शालन**—बाई, अशा रागावतां काय आमच्यावर ? घ्या ना हीं फुलं. आजच घ्या. आम्हीं पुन्हा नाहीं द्यायला येणार कध्धीं.

**कृष्णाबाई**—पुनः नाहीं अन् आजही नाहीं. चालत्या व्हा आधीं.

**शालन**—आधीं फुलं घ्या अन् मग पाहिजे तर आम्हांला शिक्षा करा.

**कृष्णाबाई**—आतां जाता इथून का आणूं चौदावं रत्न ? ( मुली कष्टी होऊन जातात. ) हें नवं शिक्षण. पोरी चुरुचुरु बोलायला लागल्या. ल्हान मोठं नाहींच मुळीं—म्हणे पार्टी बाहेरच्या लोकांकरिता आहे. असा संताप आला होता मला कीं द्यावी एक श्रीमुखांत ! पण शोभनाबाईची मुलगी पडली ! किती उठवळ मुली आहेत पहा ! बाईंच्या तोंडाला तोंड द्यायचं, त्यांचा उपमर्द करायचा हें अचलेचं शिक्षण. पण हा अचलेचा तांडा आज इथं माझ्याकडं कसा आला ! फुलं द्यायच्या निमित्तानं अचलेनंच आपल्या पत्राचा तपास लावण्याकरितां त्यांना इथं पाठवलं असेल का ! पाठवलंच होतं. मी तरी पत्र टेबलावर कसं ठेवलं ! पण ही शालन कांहीं घोटाळा करणार नाहीं ना ! छे ! पोरीची जात ! जाईल विसरून. ( सरलाबाई येते. )

**सरलाबाई**—पोरांची जात विसरणार नाहीं वरं. पण कां ! आज मानसशास्त्राचं संशोधन चालवलंय ! मुलींच्या स्मरणशक्तीबद्दल कसला विचार चालला होता ! आला वाटतं मुलींचा पुळका !

**कृष्णाबाई**—आतां तुमचा प्रवेश आहे वाटतं ?

**सरलाबाई**—प्रवेश ? प्रवेश आतांच झाला. प्रवेशाबरोबरच प्रवेश सुरू झाला. पाहिजे तर तो आणखी चालू ठेवतां येईल.

**कृष्णाबाई**—तुमचे सूत्रधार कुठं आहेत !

**सरलाबाई**—कर्णधारानं सत्ता हातीं घेतल्यावर सूत्रधाराचं काम काय ? आपल्याला कोणता सूत्रधार पाहिजे आहे ?

**कृष्णाबाई**—नाटकांतला नाहीं हं ! हल्लीं नव्या नाटकांतून त्याचं उच्चाटन झाल्यामुळं त्यानं व्यवहारांत ठाणं दिलं. अशा पहातां काय ? अचलाबाई कुठं आहेत ? आलं ना ध्यानांत ? त्यानींच पाठवलं ना तुम्हांला ?

**सरलाबाई**—अस्सं ! [ छद्मी हंसते. ] मी आपल्याकडेच येत होतें. पण मुलीही आपल्याकडेच आलेल्या पाहिल्या म्हणून जरा बाहेरच थांबलें. कृष्णाबाई, मनुष्याला एकदां मत्सरानं घेरलं कीं सारं जग त्याला शत्रू वाटतं, त्याच्या हालचालींत त्याला कारस्थान दिसूं लागतं. त्या बिचाऱ्या मुली किती आनंदानं तुमच्याकडे आल्या होत्या ! पण त्यांच्या विमल आनंदांत तुम्हांला कारस्थान दिसलं. त्यांचं सरळ बोलणं टोचूं लागलं. त्या शिक्षा सोसायला तयार झाल्या तरी त्यांच्या फुलांचा तुम्ही स्वीकार केला नाहीं. कल्पना करा, हीच परिस्थिति तुमची झाली असती तर कृष्णाबाई तुम्हांला काय वाटलं असतं !

**कृष्णाबाई**—अस्सं ! शिक्षकिणीच्या धंद्याला वकिलीच्या धंद्याची जोड दिलीत वाटतं? चांगलं !

**सरलाबाई**—शिक्षक हा एक प्रकारें मुलांचा वकीलच होय. मुलांची बाजू मांडायला त्याला काय हरकत आहे ! तुमचं आतांचं वर्तन कुणालाही तिरस्करणीयच वाटेल. अचलेचा तुम्हांला मत्सर वाटतो म्हणून त्याचं उट्टं तुम्हीं बालमनाचा धि:कार करून काढलंत हीच गोष्ट तुमच्या मत्सराची साक्ष देत आहे.

**कृष्णाबाई**—मला व्यवहाराचे धडे देण्याकरितां आलांत तुम्हीं ? हो ! नाहींतर कधींही न येणाऱ्या तुम्ही आज इकडं कशा चुकलांत ! बसा तर मग. मलाही तुम्हांला दोन गोष्टी सुनवायच्या आहेत. सरलाबाई, दुसऱ्याच्या डोळ्यांतलं कुसळ दिसतं, स्वतःच्या डोळ्यांतलं मुसळ दिसत नाहीं. माझ्या वर्तनानं तुम्हांला तिरस्कार उत्पन्न होतो, पण अचलेच्या वर्तनानं तुम्हांला आनंद होतो. असं कां बरं होतं ?

**सरलाबाई**—कां होतं ? कारण अगदीं उघड आहे. अचलेला कुणाचा मत्सर वाटत नाहीं. तिचं मन आरशासारखं आहे. ती सर्वांवर प्रेम करते आणि म्हणूनच मुलींना, शिक्षकिणींना तिच्याबद्दल जिव्हाळा वाटतो. कृष्णाबाई, प्रेम दिल्याशिवाय मिळत नाहीं आणि मिळाल्याशिवाय आनंद उपभोगतां येत नाहीं.

**कृष्णाबाई**—अगदीं खरं आहे तुमचं म्हणणं. मीसुद्धां तेंच म्हणतें आहे. अचलेच्या प्रेमाची देवाण घेवाण या कन्याविहारापुरतीच नसून कन्या-विहाराच्या बाहेर चालू आहे.

**सरलाबाई**—पण यांत अचलेचा काय दोष ? दुसरीं माणसं तिच्यावर प्रेम करतात त्याला ती काय करणार ?

**कृष्णाबाई**—प्रेमाचा मोबदला देणार ! सरलाबाई, स्त्रीनं स्त्रीवर प्रेम करणं यांत कांहींच वावगं नाहीं.

**सरलाबाई**—आणि पुरुषावर प्रेम करणं तरी काय वावगं आहे ? पुरुष म्हणजे काय ' रामागडी ' समजतां होय ? पुरुषांशीं संबंध येऊं द्यायचा नाहीं तर मग हा कन्याविहार पुढें मागें बंदच होणार म्हणायचा !

**कृष्णाबाई**—तसं नव्हें. परंतु अचलेनं स्वीकारलेला मार्ग अगदीं निराळा आहे.

**सरलाबाई**—म्हणजे ?

**कृष्णाबाई**—म्हणजे ? सरलाबाई, तुम्ही भोळ्या आहांत. जादुगाराच्या पुंगीनं नाग जसा डोलूं लागतो त्याप्रमाणं अचलेच्या मायेनं भारल्या गेल्यामुळं तिच्या प्रत्येक कृतीनं तुम्ही डोलूं लागतां, तुम्हांला स्वतःचा विसर पडतो.

**सरलाबाई**—हाच आरोप मी आपल्यावर केला तर ? अचलेच्या गौरवा-मुळं आमच्या आनंदाला भरती येते, पण तुमचं पित्त खवळतं याला तरी काय कारण ? अचला आल्यापासून तुमचं महत्त्व कमी झालं, तिचं महत्त्व वाढलं म्हणून मत्सराग्नीनं पेटून तिची प्रत्येक कृती तुम्हांला दोषपूर्ण दिसूं लागली.

**कृष्णाबाई**—माझं महत्त्व, माझा दरारा मी शेवटपर्यंत कायम ठेवीन. ज्या दिवशी तें कमी होईल, त्या दिवशीं ही कृष्णाबाई राजीनामा देऊन हा कन्या-विहार सोडून जाईल हे पक्कं लक्षांत ठेवा. मला मानानं जगायचं आहे, तुमच्या-सारखं अपमानांत पिचत पडायचं नाहीं.

**सरलाबाई**—तुम्हांला एकदम पडायचं आहे. कृष्णाबाई, स्वतःला मानानं जगण्यासाठींच त्या निष्पाप मुलींचा अपमान केलांत. त्यांना हिरमुसलं करून घालवून दिलंत. काय मिळालं तुम्हांला ?

**कृष्णाबाई**—त्यांना योग्य वळण लावण्याकरितांच मला त्यांच्याशीं तसं वागणं भाग पडलं. अलीकडे त्या कोणाही बाईंना मोजीनाशा झाल्या आहेत.

सगळयाजणीं त्यांना अचलेसारख्या वाटतात. त्यांचे असले चाळे अचलेला खपत असतील. तिनं त्यांना डोक्यावर घ्यावं. आम्ही त्यांना आमच्या पायाशीं उभं करणार नाहीं.

**सरलाबाई**—हें मुलींचं झालं. पण अचलेच्या वागणुकींत तुम्हांला गर्हणीय काय दिसलं ? तिनं असं काय केलं हो ?

**कृष्णाबाई**—तुम्हांला माहीत नाहीं ? असं कसं होईल ? तुम्ही तर अगदीं तिच्या खासगींतल्या–जिवाभावाच्या मैत्रिणी ! तुम्हांला माहीत असणारच.

**सरलाबाई**—तुमच्या ह्या संदिग्ध भाषेचा मला उलगडाच होत नाहीं. तुम्ही कांहीं पाहिलंत का ?

**कृष्णाबाई**—पाहिलं ? पाहिलं नाहीं–वाचलं.

**सरलाबाई**—असं, असं ! त्या पत्रासंबंधीं बोलतां होय ?

**कृष्णाबाई**—आतां कशा आल्यात ताळयावर !

**सरलाबाई**—ताळयावर नाहीं आलें. मी तपासाकरतां आलें आहे.

**कृष्णाबाई**—म्हणजे ? नाहींसं झालं वाटतं तें पत्र ! आतां कुठं तपास करणार तुम्हीं ?

**सरलाबाई**—फार लांब जायला नको. आपल्याकडंच. ( कृष्णाबाई दचकते. )

**कृष्णाबाई**—माझ्याकडं ? माझं घर म्हणजे काय लॉस्ट प्रॉपर्टी ऑफिस आहे वाटतं ? मला आपल्या कळपांत ओढायचा बेत दिसतो आहे.

**सरलाबाई**—कळप कसला अन् बेत कसला ?

**कृष्णाबाई**—कळप नसेल कदाचित्, पण बेत मात्र खास !

**सरलाबाई**—बेत तरी कसला ?

**कृष्णाबाई**—बनवायचा. आपण बनलांत आणि जगाला बनवायला निघालांत. ' मारुतीच्या बेंबींत गार ' म्हणतात ना ? तसाच प्रकार करताहांत.

**सरलाबाई**—मी बनलें ?

**कृष्णाबाई**—नाहीं तर काय ? अचला सांगते मी पत्र नेलं म्हणून, आणि त्यावर विश्वास ठेवून तुम्ही माझ्याकडं तपासाला येता. अशानं तुमचा भोळा भाव रिडीम जायचा नाहीं बरं ! असलं पत्र कोणतीही स्वाभिमानी स्त्री हातांत

धरणार नाहीं. मी तें पाहिलं, वाचलं. त्याची फोड करून तिला सांगितलं. सारं माप गळ्यांत घातलं. तेव्हां आपल्या गळ्यांतलं घोंगडं दुसऱ्याच्या गळ्यांत अडकवायचा तिचा हा कांगावा आहे. त्या पत्राचा मतलब मी तात्काळ ताडला, तिला स्पष्टपणें बोलून दाखवला. इतकंच नव्हे तर संस्थेच्या दृष्टीनं त्याचा विचार करावा लागेल असंही निक्षून सांगायला कमी केलं नाहीं. तेव्हां इतकं झाल्यानंतर पत्र मी पळवलं असा कांगावा करण्याखेरीज अचलेला गत्यंतरच नाहीं.

**सरलाबाई**—असं काय होतं त्या पत्रांत ?

**कृष्णाबाई**—काय होतं ? सारं रामायण ऐकून झालं तरी रामाची सीता कोण हें विचारतांच ? अहो, रावसाहेब तुमच्या अचलेवर प्रसन्न झाले आहेत !

**सरलाबाई**—तुमच्या जिभेला कांहीं हाड आहे का कृष्णाबाई ? काय भलतंच बोलतां हें ?

**कृष्णाबाई**—खरं बोलणं हा गुन्हा आहे का सरलाबाई ?

**सरलाबाई**—काय खरं ? कुठं रावसाहेब अन् कुठं यःकश्चित् अध्यापिका अचला ! शक्य तरी आहे का हें ?

**कृष्णाबाई**—आजकाल अशक्य वाटणाऱ्या गोष्टींच सत्य स्वरूपांत दिसू लागतात बरं सरलाबाई. हा सुधारणेचा काळ आहे. समाजाचं पाऊल प्रत्यही पुढं पडत चाललं आहे हें विसरून चालायचं नाहीं. कोण केव्हां काय करील त्याचा नेम नाहीं.

**सरलाबाई**—अजूनसुद्धां पटत नाहीं तुमचं बोलणं. अचला अशा मार्गानं जाईल हें मला तरी शक्य दिसत नाहीं.

**कृष्णाबाई**—मग कां बरं तिनं तुम्हांला रावसाहेबांचं पत्र दाखवलं नाहीं ? तुम्ही अगदीं तिच्या गळ्यांतल्या ताईत ना ? एकीला बोचलं तर दुसरीला कळ लागते इतक्या तुम्ही एकजीव ना ? मग तिनं तें पत्रं तुमच्यापासून कां लपवून ठेवावं ?

**सरलाबाई**—हें कसं तुम्ही म्हणतां ? तिला जर लपवूनच ठेवायचं असतं तर तुम्हांलाही तें तिनं दाखविलं नसतं. पण ज्याअर्थी तुम्हांला तें वाचायला मिळालं, त्याअर्थी तुम्ही म्हणतां तसा कांहीं प्रकार असेल असं मुळींच म्हणतां येणार नाहीं.

**कृष्णाबाई**—तुमचा हा भाबडेपणा पाहून मला तुमची फार दया येते. अचला दिसते तशी साधीभोळी नाहीं बरं ! तिचं राजकारण मोठं दांडगं आहे. मला तें पत्र दाखवायला ती कचरली नाहीं याचं कारण, मी त्या पत्रा-बद्दल कितीही प्रलाप काढले तरी मी मत्सरी आहे, माझ्या बोलण्यावर कुणीही विश्वास ठेवणार नाहीं अशी तिची बालंबाल खात्री आहे. तुमचीच गोष्ट घ्या ना. तुमचा बसला का विश्वास माझ्या बोलण्यावर ? सरलाबाई, हल्लींच्या जगांत फार धूर्तपणानं वागलं तरच टिकाव लागेल बरं.

**सरलाबाई**—( विचार करते. ) खरंच तिनं कां बरं मला पत्र दाखवलं नाहीं ? पण उलट पत्र हरवल्याचा बहाणा करायला मात्र कमी केलं नाहीं !

**कृष्णाबाई**—पहा, आतां तुम्हीच आपल्या तोंडानं कबूल करतां म्हणून बरं आहे. अशी पहातां पहातां पत्रं हरवायला लागलीं म्हणजे पहायलाच नको.

**सरलाबाई**—तुमचं म्हणणं मला पटतं कृष्णाबाई. पण त्याबरोबरच सदो-दित प्रांजलपणानं वागणारी अचला माझ्याशीं अशी प्रतारणा कां करील याचं मात्र समाधानकारक उत्तर मिळत नाहीं.

**कृष्णाबाई**—कारण अगदीं उघड आहे. सरलाबाई, मनुष्याचं मन पापी असतं. तें ज्यावेळीं एखादं पापकृत्य करण्याचा विचार करतं, किंवा त्याच्याकडून तें घडतं त्यावेळीं त्याचा बभ्रा होऊं नये याबद्दल तें पूर्ण दक्ष असतं. अचलेनं ही दक्षता बाळगली नसती तरच मला आश्चर्य वाटलं असतं ! ती फार धोरणी आहे बरं !

**सरलाबाई**—पण तें कांहीं जरी असलं तरी ती माझ्यापासून कांहींही लपवून ठेवीत नाहीं आणि ठेवणारही नाहीं अशी माझी पूर्ण खात्री आहे.

**कृष्णाबाई**—इतकं पुरेपूर माप पदरांत टाकलं तरी अजून खात्री आहे ना ? राग मानूं नका सरलाबाई. मी स्पष्टच बोलतें. समजा, तुमच्या मनांत कांहीं पाप आलं–नव्हे तुमच्या हातून एखादं पाप घडलं तर तुम्हीं तें अचलेला सांगाल काय ? अचला जरी तुम्हांला जीव कीं प्राण असली तरी आपल्या पापाचा पुरावा–पापाचा कबुलीजबाब तुम्ही अचलेला याल काय ? ( ती स्तब्ध रहाते. ) कां ? आतां स्तब्ध कां ? ती तुमची जिवश्चकंठश्च मैत्रीण ना ? तुम्हीं तिला तें उघडपणें सांगू शकाल असं वाटतं तुम्हांला ?

**सरलाबाई**—तुमच्या बोलण्यानं मी गोंधळून गेलें बाई. तुमच्या बोलण्यांत कांहीं तथ्य असावं असं मला आतां वाटूं लागलं आहे. अचलेचं आजपर्यंतचं मायावी वर्तन मला समजलं नाहीं हेंच खरं !

**कृष्णाबाई**—कसं समजणार तें ? हीं असली कार्यसाधु माणसं मोहजाल पसरण्यांत अति पटाईत असतात. स्वतःच्या लटक्या हुशारीच्या नि वशिल्याच्या जोरावर तिनं आतांपर्यंत कन्याविहारांतल्या साऱ्या अधिकाऱ्यांना झुलवलं. एकालाही तिचं खरं स्वरूप समजलं नाहीं. त्याच्या उलट माझ्या स्पष्टवक्ते-पणामुळं सर्वांच्या दृष्टीनं मीच वाईट ठरलें मात्र !

**सरलाबाई**—कृष्णाबाई, अचलेच्या कपटनीतीला मी बळी पडलें आणि तुमच्याशीं वैर केलं याबद्दल मला अत्यंत खेद होत आहे. न जाणो अचलेच्या या कलंकित कृत्याचा माझ्यावरही शिंतोडा उडाल्याशिवाय राहाणार नाहीं, अशी मला आतां भीति वाटूं लागली आहे. कृष्णाबाई, अचलेचं खरं स्वरूप जसं मला दाखवलंत तसंच तिच्या कपटनाटकांतून सहीसलामत सुटण्याचा मार्गही मला आपणच दाखवला पाहिजे.

**कृष्णाबाई**—पण माझ्यावर आपला विश्वास आहे का ? पहा, नीट विचार करा अन् मगच पुढं पाऊल टाका. एकदम एखाद्यावर विश्वास टाकणं हें केव्हांही धोक्याचं असतं हें लक्षांत ठेवा.

**सरलाबाई**—कृष्णाबाई, कां बरं लाजवतां मला असं बोलून ? एकदां मी फशीं पडलें म्हणून त्याची पुनरावृत्ति होईल असं का वाटतं आपल्याला. नाहीं बरं ! आतां मी पूर्ण विचार करूनच आपल्या आश्रयाला आलें आहे. माझं चारित्र्य निष्कलंक राखणं आतां आपल्या हातीं आहे.

**कृष्णाबाई**—तर मग असं करा. अचलेच्या या पापाचा पाढा शोभना-बाईंच्या पुढं वाचा. त्यांनाही त्या महामायेचं खरं स्वरूप जाणवायलाच पाहिजे मात्र लक्षांत ठेवा माझ्या नांवाचा उच्चारही होता नये. तें अगदीं गुप्त राहिलं पाहिजे. सारी परिस्थिति तुम्ही अजमावलीत—नव्हे प्रत्यक्ष पाहिलीत असंच भासलं पाहिजे शोभनाबाईंना. शोभनाबाई आपल्या काबूंत येऊं द्या कीं मग पहा कसा आपल्या नाटकाला रंग चढेल तो !

**सरलाबाई**—ठीक आहे ! असंच करायला पाहिजे. आतांपर्यंत मीच तिला डोक्यावर चढवलं आतां मीच तिला नामशेष करीन. आपण कांहीं एक काळजी करूं नका. आतां मी आहे अन् अचला आहे. ( अचला येते. )

**कृष्णाबाई**—कोण ? अचला ? कां आलीस माझ्या खोलींत ?

**अचला**—कां आलें ? कृष्णाबाई, मुली मोठ्या प्रेमानं फुलं द्यायला आल्या तर त्यांचं कौतुक करून फुलांचा स्वीकार करायचं सोडलंत आणि त्या चिमण्या जिवांना धाकदपटशा दाखवून हुसकून लावलंत. काय म्हणावं या तुमच्या सूडबुद्धीला ? त्याचाच जाब विचारण्यासाठीं मी इथं आलें आहें.

**सरलाबाई**—दुसऱ्याला जाब विचारण्यापूर्वी अचले, मला तुझ्या पापकृत्याचा जाब पाहिजे. ( अचला अस्वस्थ होते. ) आजपर्यंत गळ्यांत गळा घालून माझ्याशीं मोठ्या प्रेमानं वागलीस. आम्ही तुझा उदोउदो केला. पण तूं पसरलेल्या मोहजालानं भारल्यामुळं तुझं बेगडी स्वरूप आम्हांला दिसलं नाहीं. तुझ्या प्रेमाचे चाळे मला समजूं नयेत म्हणून रावसाहेबांचं पत्र स्वतःच लपवून ठेवलंस आणि तें कृष्णाबाईनीं पळवून नेल्याचा बभ्रा केलास. कृष्णाबाईसारख्या सरळ बुद्धीच्या सत्यनिष्ठ स्त्रीवर असला घाणेरडा आरोप करायला तुला कांहींच कसं वाटलं नाहीं ?

**अचला**—काय ? सरलाबाई, तुम्हीच का बोलतां हें ! आपल्याशीं मी कपट करीन का ?

**कृष्णाबाई**—करीन का कशाला ? केलंस.

**अचला**—छे छे ! सरलाबाई, हें कुभांड आहे. माझ्याविरुद्ध रचलेलं हें कृष्णकारस्थान आहे. माझ्यावर विश्वास ठेवा. मी निष्कलंक आहे.

**सरलाबाई**—खोटं ! साफ खोटं ! तुझ्या चारित्र्याची खरी कल्पना आतांच मला कृष्णाबाईनीं करून दिली आहे. आतां तुझ्या बोलण्यावर माझा काडीइतकाही विश्वास बसणार नाहीं. जा, आजपासून माझ्या मैत्रीला तूं कायमची अंतरलीस.

**अचला**—अरेरे ! काय ऐकतें मी हें ! ( मुर्च्छित पडते. सरला सावरते. )

**कृष्णाबाई**—आतां मात्र माझ्या कपटनाटकाला खरा रंग चढणार !

[ पडदा पडतो. ]

# अंक चवथा.

[ कन्याविहारांतील अचलेची खोली-खोलींतील सर्व सामान आवरलेलें-होल्डॉल बांधून कोपऱ्यांत ठेवलेला-अचला पत्र लिहित असते पत्र वाचून नंतर पाकीटांत घालून बंद करून ठेवते. ]

**अचला**—काय विचित्र घटना आहे ! ज्या सरलाबाईनीं माझ्यावर प्रेम केलं, माझ्या प्रत्येक कृतीचं कोडकौतुक मोठ्या अभिमानानं पुरवलं, त्याच सरलाबाई क्षणभरच कृष्णाबाईंच्या जाळ्यांत सांपडून माझ्या विरुद्ध व्हाव्या ना ! हें कसं झालं असेल ? कृष्णाबाईनीं असं कोणतं जहरी विष त्यांच्या कानांत ओतलं कीं, त्यामुळं त्यांचं अंतरंग साफ बदलून जावं ? विचारानं बुद्धि अगदीं स्तिमित होत चालली ! आतां विचार करण्यांत काय अर्थ आहे! ( टेबलावरील पत्र घेते. ) हा राजीनामा ! राजीनामा ! (सुस्कारते.) या राजीनाम्यानं संस्थेच्या कारभारांतून माझी मुक्तता होईल. पण मुलींच्या ऋणांतून ? दोन वर्षांत मला जीव कीं प्राण झालेल्या मुलींना मी एकदम कशी बरं सोडून जाऊं ? मी गेल्यानंतर माझी हीं कोमल फुलं कोमेजून नाहीं का जाणार ? कोमेजून जातील ? कां बरं ? किती वेडी मी ! मुलांचं काय ! कोणाही गोडबोल्या माणसाशीं तीं खेळूं शकतात-रमूं शकतात. दुसऱ्या बाई येतील. सुरवातीला चुकल्या चुकल्या सारखं होईल. पण कालांतरानं त्यांच्याबद्दल मुलींना जिव्हाळा वाटूं लागेल. पण माझं काय होईल ? माझ्या आयुष्यांत मुलींनीं फार मोठं स्थान पटकावलेलं आहे. मुलींची आणि माझी ताटातूट झाली कीं संपलंच माझं जीवन ! (इकडे तिकडे पहाते. ) जाण्यापूर्वी मुलींची भेट तरी ? नको. आज सकाळपासून मी त्याना टाळतें आहे. आतां मला मुली भेटल्या तर सकाळपासून अडवून ठेवलेला प्रीतीचा बांध फुटल्याशिवाय कसा राहील ? भेट नाहीं पण निदान त्यांचं दर्शन तरी ! ( बाहेर पहाते.) त्यांना कळवल्याशिवाय मी गेलें तर त्या मला दोष नाहीं का देणार ? (सुस्कारते.) पत्रानंच निरोप द्यावा झालं ! (पत्र लिहावयास बसते-लिहितांना हुंदके येतात-तसेंच पत्र पुरं करते. वाचते. ) मुलींना संदेश लिहिण्याचा आतां मला काय अधिकार आहे ? मी गेल्यानंतर माझ्या चारित्र्याविषयीं कन्याविहारांत बभ्रा झालाच

तर या संदेशाकडे मुलींनीं कोणत्या दृष्टीनं पहायचं ! अशानं मुलींचीं दिशाभूल नाहीं का होणार ? गुरूंनीं शिष्यांचीं दिशाभूल करणं हा अक्षम्य गुन्हा आहे. नाहीं. असला गुन्हा मी केव्हांही करणार नाहीं. ( पत्र फाडून टाकते. मुली येतात—थबकतात—कुजबुजतात. )

**शालन**—कुठं निघालांत बाई ?

**अचला**—गांवाला.

**नलिनी**—आम्हांला अगोदर कळवल्याशिवाय.

**अचला**—तसंच महत्वाचं काम आहे. येतें बरं मी. ( मुली अडवतात. )

**मीनाक्षी**—हां बाई ! तुम्ही कुठं जातां तें सांगितल्याशिवाय आम्ही नाहीं जाऊं देणार तुम्हांला.

**अचला**—खरंच गांवाला निघालें मी.

**शालन**—एवढी सगळी आवराआवर करून ?

**किशोरी**—तुम्ही तर घर सोडून जातात तशाच निघालांत ?

**अचला**—घर सोडून ? हो ! घर सोडूनच मी—नाहीं घरं सोडून नाहीं जात मी.

**नलिनी**—असं काय करतां बाई ? आज तुम्हांला झालंय तरी काय ? असं तुटक तुटक कां बोलतां ? सांगा ना काय झालं तें ?

**अचला**—कांहीं झालं नाहीं.

**शालन**—नाहीं कसं ? कांहीं झालं नाहीं तर तुम्ही अशा दुःखी कां ? बाई रागावलांत का आमच्यावर तुम्ही ?

**अचला**—नाहीं बर बाळ. मी तुमच्यावर कधींतरी रागावतें का ?

**किशोरी**—मग तुम्ही कुठं निघालांत तें कां सांगत नाहीं आम्हांला ?

**अचला**—माझं जरूरीचं काम आहे. तें झालं कीं मी परत येईन.

**नलिनी**—मग त्याला एवढी आवराआवर करून जावं लागतं ? नाहीं बाई, तुम्ही आमच्यापासून कांहींतरी लपवून ठेवीत आहांत. आज तुमचं चित्त कांहीं ठिकाणावर दिसत नाहीं. तुमचा कांहींतरी विलक्षण बेत दिसतो आहे.

**शालन**—अय्या ! हें काय ? ( सर्व मुली शालनभोवतीं गोळा होतात. तिच्या हातांत अचलेनें फाडलेलें पत्र असतें. मुली वाचतात. कष्टी होतात. ) बाई,

तुम्ही खरंच जाणार ! आम्हांला सोडून जाणार तुम्ही ? ( अचला दुःखावेगानें खालीं बसते. मुली तिच्याभोंवतीं गोळा होतात. अचलेला हुंदके येतात. ) बाई, बाई, बोलत कां नाहीं तुम्ही ?

**नलिनी**—वासंती, तूं जा आणि मोठ्या बाईंना घेऊन ये लवकर.

**अचला**—नल्ू, कशाला बोलावतेस त्यांना उगाच ?

**शालन**—मग, तुम्ही कां निघालांत ? आमचं कां ऐकत नाहीं तुम्ही ? जा ग वासंती. आम्ही कांहीं सोडत नाहीं आतां बाईंना. ( वासंती जाते. )

**मीनाक्षी**—बाई, अजून तरी सांगा काय झालं तें ? आज सकाळपासून तुम्ही आमच्याशीं नीट बोललांतसुद्धां नाहीं. कां बरं असं ?

**अचला**—कांहीं नाहीं, उगाच.

**शालन**—उगाच ? मग तुमचे डोळे असे पाण्यानं कां भरलेले ? कोणी बोललं का तुम्हांला ? तुम्ही आम्हांला सोडून कां निघालांत ? बाई, बोला, बोलाना आमच्याशीं.

**नलिनी**—शालन, मीना, आतां आपण बाईंना त्रास देणं बरं नाहीं. त्यांचं चित्त आज ठिकाणावर नसल्यामुळं आपल्या प्रश्नांनीं त्यांना उलट दुःख होईल. चला. मोठ्या बाई येईपर्यंत आपण बाहेर बसूंया. ( जावयास निघतात. )

**अचला**—( उठते. ) थांबा. नल्ू, मला सोडून कुठं निघालांत ?

**किशोरी**—तुम्ही आम्हांला सोडून कुठं निघालांत तें सांगा अगोदर.

**अचला**—( सुस्कारते. ) मी कुठं निघालें ? मी कुठं निघालें ! ज्या ठिकाणीं उच्च नीच भाव नाहीं, हेवा-मत्सराला वाव नाहीं आणि कपटनीतीचे डाव नाहींत अशा ठिकाणीं मी जात आहें. कन्याविहारांत आल्यानंतर इथलं रुक्ष वातावरण बदलून मी आनंद-साम्राज्य निर्माण केलं पण त्याच आनंद-साम्राज्याच्या निर्मितिमुळंच माझ्यावर हा प्रसंग ओढवला आहे. तुम्हांला काय कळणार त्यांत ? तुमचा माझा संबंध आतां फारच थोडा आहे. मी गेल्यानंतर माझी आठवणसुद्धां तुम्हीं—

**नलिनी**—बाई, काय बोलतां हें ? तुमची आठवण विसरायला सांगता ? आम्हांला तुमचा विसर पडणं शक्य आहे का ? मुलं कधीं आईला विसरतील

का ? कन्याविहारांत तुम्ही आम्हांला आईच्या ठिकाणीं आहांत. तुम्ही आमचं लालनपालन करता, शिक्षण देता, त्या तुम्हांला आम्ही कसं विसरावं ? तुमचा जिव्हाळा विसरणं शक्यच नाहीं ? मातृप्रेमाची प्रतारणा आमच्या कडून होईल का बाई ?

**अचला**—नाहीं. तसं तुमच्याकडून केव्हांही होणार नाहीं. पण—

**शालन**—तुम्हांला तरी आम्हांला सोडून जाववतं तरी कसं ?

**अचला**—शालन, मी सुखानं का जात आहे ? तुम्हांला सोडून जातांना माझ्या हृदयाची कालवाकालव होत आहे. एकीकडे तुमचं प्रेम व स्वतःचं कर्तव्य, दुसरीकडे जगांतला मत्सर–विषमता यांचं द्वंद्व चाललं आहे. स्वतःचं कर्तव्य करीत असतांना मत्सरी माणसांनीं माझ्या विरुद्ध काहूर—जाऊं दे. मनाचा तोल जाऊं लागला–( हेडमिस्ट्रेस व वासंती येतात. )

**हेडमिस्ट्रेस**—तोल जाऊं देतां कामा नये. तो सावरलाच पाहिजे. मुलींनों, जा तुम्ही आतां. तुमच्या बाईंना कांहीं मी जाऊं देणार नाहीं. ( मुली जातात. ) अचले, ( अचलेला हुंदका येतो. ती हेडमिस्ट्रेसला मिठी मारते. ) छे ! सात्त्विक प्रेमाशिवाय अन्य भावना या ठिकाणीं दिसतच नाहीं. किती निष्पाप अंतःकरण आहे हिचं. हिच्या हृदयांतील प्रत्येक ठोका ती निर्दोष असल्याची मला ग्वाही देत आहे. या अभागी जीवाकरितां मी माझी पुण्याई खर्ची घालून या कारस्थानाचा बीमोड करीन. अचले, मी कां आलें ? माहीत आहे तुला ?

**अचला**—बाई, तुम्ही कां आलांत आणि जग कसं आहे हें कांहीं मला सांगतां येत नाहीं. आजपर्यंत मुलांफुलांत मी फुलपांखराप्रमाणें बागडत होतें. तुम्ही माझं कौतुक करीत होतां ! त्याचं कृष्णाबाईंना वैषम्य वाटत होतं. त्या वैषम्यांतून वैराचं हलाहल निर्माण झालं आणि त्यानं माझ्या अमृततुल्य प्रेमळ जीवनाला ग्रासलं. इतकंच नव्हे तर आतां माझ्या जिवाभावाच्या मैत्रिणीला-सरलाबाईंना माझं विशुद्ध जीवन विपरित दिसूं लागलं. त्याचाच माझ्या मनावर घोर परिणाम झाला आणि मी भांबावून गेलें. बाई, तुम्ही मला माझ्या आई-प्रमाणं आहांत. सांगाल का मला याचा अर्थ ?

**हेडमिस्ट्रेस**—अचले, तोच अर्थ सांगण्याकरितां मी इथं आलें आहे. पण तूं आधीं शांत हो पाहूं.

**अचला**—शांत होऊं? कशी शांत होऊं? अंतःकरण पेटलं असतांना मला शांत कसं होतां येईल? कृष्णाबाईच्या मत्सरी स्वभावामुळं त्यांच्या वागणुकीचा मला कांहींच विषाद वाटत नसे. पण काल घडलेल्या प्रकारामुळं माझ्या हृदयाला अतिशय खोल अशी जखम झाली आहे. माझ्या जिवश्च–कंठश्च मैत्रिणीच्या प्रेमाला मी पारखी झालें, याचंच मला राहून राहून वाईट वाटतं आहे.

**हेडमिस्ट्रेस**—आयुष्याच्या समरभूमीवर असे चढउतार यायचेच. त्या प्रसंगीं स्वतःचं स्थैर्य ढळूं देऊन कसं बरं चालेल?

**अचला**—खरं आहे तुमचं म्हणणं तुमचे विचार मला पटतात. पण डोक्यांत माजलेलं विचारांचं काहूर कांहीं केल्या कमी होत नाहीं त्याला मी काय करूं?

**हेडमिस्ट्रेस**—अचले, विचारानं मनुष्य वेडा होतो. झालेल्या गोष्टीबद्दल जास्त विचार करून मन दुःखी करण्यापेक्षां त्यांतून आपल्याला मार्ग कसा काढतां येईल याचाच विचार करणं जास्त श्रेयस्कर नाहीं का? म्हणून म्हणतें, झालेला प्रकार मला सांग. पहातें मला कांहीं मार्ग सुचतो का!

**अचला**—तुम्ही मला सहाय्य करणार? सरलाबाईसुद्धां मला सहाय्यच करणार होत्या. पण माझ्यावरच्या संकटांतून मार्ग काढतांना त्याच त्यांत गुरफटल्या आणि माझ्या शत्रू बनल्या. बाई, मला भीति वाटते. मला सहाय्य करून माझ्या शत्रुसंस्थेंत आणखी भर घालूं नका.

**हेडमिस्ट्रेस**—अचले, तूं परिस्थितीच्या फेऱ्यांत सांपडलीस. त्यांतून तुला मोकळं करणं मी माझं कर्तव्य समजतें. मी तुझी आई आहे. माझी इच्छा तूं मोडणार का?

**अचला**—सरलाबाईसुद्धां मला बहीण समजत होत्या. पण त्यासुद्धां माझ्याबर उलटल्या. आतां मी कोणाचा कसा विश्वास धरूं?

**हेडमिस्ट्रेस**—काय? माझ्यावर तुझा विश्वास नाहीं?

**अचला**—क्षमा करा. उद्वेगाच्या भरांत मी भलतंच बोलून गेलें. मनाचा तोल सावरतां आला नाहीं म्हणूनच असे बेताल बोल माझ्या तोंडून बाहेर आले.

**हेडमिस्ट्रेस**—या ठिकाणीं मी हेडमिस्ट्रेस या नात्यानं बोलत नसून तुझी आई म्हणून मी तुला विचारतें आहे. माझ्यावरचा तुझा विश्वास नाहींसा झाला का ?

**अचला**—मी काय उत्तर देऊं ? दुधानं तोंड पोळलं कीं ताकसुद्धां फुंकून प्यावं लागतं ! तशीच माझी अवस्था झाली आहे. माझ्या बहिणीनं मला दगा दिला. पण आई—

**हेडमिस्ट्रेस**—आईच आहे मी तुझी. सांग, बहिणीचं प्रेम आणि आईचं प्रेम सारखंच का ? बहिणीच्या प्रेमानं दगा दिल्याची इतिहासांत ठळक उदाहरणं आहेत. पण आईनं आपल्या पोटच्या गोळ्याशीं मायावी वर्तन करून त्याचा विश्वासघात केल्याची उदाहरणं आपल्या डोळ्यासमोर आहेत का ? मग अचले, मी तुला माझी मुलगी मानली आहे. माझ्या इच्छेप्रमाणं तूं वागणार नाहींस का ?

**अचला**—तुमची इच्छा ! आईची इच्छा ! माझ्या जन्मदात्या आईची इच्छा मी पुरवली पण ती पहायला माझ्या दुर्दैवानं ती जगलीच नाहीं. ती जिवंत असती तर बाई मला ती डोक्यावर घेऊन नाचली असती. माझं कार्य पाहून मला कुठं ठेऊं अन् कुठं न ठेऊं असं तिला झालं असतं. पण मीच कम-नशिबी त्याला काय करणार !

**हेडमिस्ट्रेस**—काय होती तुझ्या आईची इच्छा ?

**अचला**—मी पुष्कळ शिकावं. जगांत नांवारूपाला चढावं. साऱ्या जगानं माझ्याकडं अभिमानानं पहावं अशी तिची इच्छा होती. वडिलांच्या मनांतून मला शिकवायचं नव्हतं. ते पक्के सनातनी होते. चूल आणि मूल यापेक्षां स्त्री कांहीं जास्त करूं शकते याबद्दल इतर देशांतील, आपल्या देशांतील स्त्रियांचीं उदाहरणं पाहून देखील ते कबूल करायला तयार नव्हते. पण माझी हुशारी पाहून आईनं त्यांच्याशीं भांडून मला शिक्षण दिलं. परंतु तिनं लावलेल्या वृक्षाला फळं येण्याच्या अगोदरच ती मला सोडून गेली. तिची इच्छा—माझ्या जन्मदात्या आईची इच्छा तिच्या जिवंतपणीं मला पूर्ण करतां आली नाहीं—

**हेडमिस्ट्रेस**—पण तुझ्या आईप्रमाणं मीही तुझं कौतुक नाहीं का केलं ?

**अचला**—त्याबद्दल मी आपली ऋणी आहे. त्यांतून मी आपली उतराई कशी होऊं ? बाई, आपल्या इच्छेआड मी कधींच येणार नाहीं.

**हेडमिस्ट्रेस**—शाबास ! अचले, माझ्या इच्छेला मान दिलास, मी आभारी आहे तुझी.

**अचला**—आईनं मुलींचे आभार मानायचे नसतात कांहीं.

**हेडमिस्ट्रेस**—कां बरं ? पण जाऊं दे तें. मग सांगतेस ना काय झालं तें ?

**अचला**—( टेबलावरील पाकीट देते. ) हें पत्रच वाचा म्हणजे साऱ्या गोष्टींचा एकदम उलगडा होईल. ( हेडमिस्ट्रेस पत्र वाचते. )

**हेडमिस्ट्रेस**—एकंदरींत या घोटाळयाचं मूळ रावसाहेबांच्या पत्रांत आहे तर ! असं होत तरी काय त्या पत्रांत ?

**अचला**—मी निक्षून सांगतें कीं त्यांत आक्षेपार्ह असं कांहींच नव्हतं. कृष्णाबाईनीं त्याचा स्वतः हवातसा अर्थ लावला आणि पापाचा बागुलबुवा निर्माण केला.

**हेडमिस्ट्रेस**—पण अचले, त्याकरितां तूं एकदम राजनामा देण्याचं कांहींच कारण नाहीं. आतां पहिल्या प्रथम रावसाहेबांच्या पत्राचा तपास आणि मग पुढील बेत. ( किशोरी दबकत येते. ) का ग ? कां आलीस आंत ?

**किशोरी**—आमच्यां बाईंचं काय ठरलं तें विचारायला मुलींनीं पाठवलं मला.

**हेडमिस्ट्रेस**—म्हणजे तुम्ही अजून गेलां नव्हतात तर ?

**किशोरी**—नाहीं. आम्ही अंगणांतच बसलों आहोंत. मग बाईंचं—

**हेडमिस्ट्रेस**—बाई कांहीं जात नाहींत हं. जा सांग जाऊन मुलींना.

**किशोरी**—(आनंदानं) खरंच ! खरंच बाई ? (अचलेस) नाहीं ना जाणार बाई?

**अचला**—नाही बरं. ( किशोरी उड्या मारीत नाचत जाते. )

**हेडमिस्ट्रेस**—अचले, पाहिलंस मुलींचं प्रेम. आपल्या कन्याविहारांतील या जागत्या ज्योती आहेत बरं. तुझ्या प्रेमामुळंच त्या तेवत राहतात आणि पुढंही राहतील. कांहीं घाबरू नकोस, अगदीं शांत रहा. मी येतें आतां.

**अचला**—पहातें प्रयत्न करून. पण माझ्या मनाला स्वास्थ्य लाभेल असं वाटत नाहीं. ( मुलींचें गाणें ऐकूं येतें. )

**हेडमिस्ट्रेस**—हा पहा तुझ्या जिवाचा विसांवा इकडेच येत आहे. अचले, हेंच तुझं जग. या चिमुकल्या जगांतच तुला खरा सौख्यलाभ मिळेल. या निर्विकल्प सात्त्विक जगांत तूं वावरायला लागलीस कीं बाह्य जगाचा तुला विसर पडलाच म्हणून समज. म्हणून म्हणतें या भौतिक जगांतील घडामो-डीचा विचार करून अशी रंजीस होऊं नकोस. चल आटप. पूस डोळे. तुला असं पाहिलं तर त्या चिमण्या फुलपांखरांची काय अवस्था होईल बरं ! ( ती डोळे पुसते. मुली येतात. ) का ग ? फुलबिलं नाहीं का घेऊन आलांत ?

**नलिनी**—नाही. पण नकोच बाई त्या फुलांची आठवण. (मोठ्या बाईकडे पहाते)

**हेडमिस्ट्रेस**—कां ग ? फुलांनीं काय असं घोडं मारलं आहे तुमचं ?

**शालन**—पण—नकोच ती आठवण.

**हेडमिस्ट्रेस**—अग पण जरा स्पष्ट बोला ना.

**वासंती**—पण बाई तुम्हांला जसं कांहीं ठाऊकच नाहीं ना ?

**हेडमिस्ट्रेस**—अस्सं ! अस्सं ! त्या कृष्णाबाईंचा राग फुलांवर काढतां होय ? पण मुलींनों ! तुम्ही चुकतांहांत. कृष्णाबाई तुम्हांला रागावल्या असल्या तरी त्या शिस्तीकरितां. कामाच्या घाईत तुम्ही त्यांच्याकडं गेलां असाल म्हणूनच तुम्हांला बोलल्या त्या. तुमच्या बाई नाहीं का तुम्हांला एखाद वेळ रागवत ?

**नलिनी**—छे ! आमच्या बाईंना राग कसा तो माहितच नाहीं. त्या म्हणतात फुलं आणि तुम्ही मुलं माझं मन मोहून टाकतां. फुलं काढतांना हाताला कांटा लागला तर फूल कुणी चुरगळून का टाकतं ?

**हेडमिस्ट्रेस**—वा ग चिमुरड्यांनों, तुम्हीं तर मला वेदांतच शिकवायला लागल्यांत !

**नलिनी**—अं हं ! आम्हांला वेदांत विदांत कांहीं कळत नाहीं. हें आमच्या बाईंचं सांगणं आहे. चूक आहे का हें ?

**हेडमिस्ट्रेस**—बिलकूल चूक नाहीं. पण असं पहा, फुलं काढतांना कांटा लागलाच तर केव्हां केव्हां आपण फूल फेंकूनही देतों. आणि कांट्याची कळ थांबतांच तें उचलून घेतों आणि डोक्यावर नाचवतों. तस्सं आहे हें. पुन्हां तुम्ही कृष्णाबाईंच्याकडे गेलांत, त्यांना फुलं दिलीत तर त्यांना आनंद होईल, त्या तुम्हांला शाबासकी देतील. पहा अनुभव. ( मुली एकमेकीकडे पाहून नापसंती दर्शवितात. ) बरं तसं कशाला ! तो योग मीच तुम्हांला आणून देतें. उद्यां कीं नाहीं मी तुम्हांला खाऊं देणार आहे.

**मुली**—अय्या ! बाई खाऊं देणार !

**हेडमिस्ट्रेस**—त्यावेळीं तुमचें सगळे नाच खेळ करून दाखवले पाहिजेत. आणि तें पहायला सरलाबाई, कृष्णाबाई, शालनची आई शोभनाबाई, फार काय तुम्हां सर्वांच्या आयांना मी आमंत्रण देणार आहे. त्या समारंभाचे वेळीं तुम्ही फुलं द्या कृष्णाबाईंना. मग पहा त्या तुम्हांला शाबासकी देतात कीं नाहीं.

**शालन**—अय्या ! त्यांत काय मोठसं ? तुमच्या देखत आमच्या आईच्या देखत त्या कशा रागावतील आम्हांला ?

**हेडमिस्ट्रेस**—बरं मग पाहुण्यांना नाहीं बोलवायचं.

**शालन**—छे ! पाहुणे तर आलेच पाहिजेत. आमच्या आईला आमचे सगळे नाच खेळ दाखवलेच पाहिजेत.

**मुली**—आमच्याही आईला पहायचे आहेत.

**हेडमिस्ट्रेस**—बरं. तुमच्या म्हणण्याप्रमाणं होऊं द्या. तुम्ही सगळ्या जणींनी उद्यां माझ्याकडे यायचं. तुमच्या बाईंना पण घेऊन यायचं हं.

**मीनाक्षी**—बाईंना पण घेऊन यायचं ? मग काय मजाच मजा ! बाई, याल ना आमच्या बरोबर ? ( तिच्या भोंवतीं गोळा होतात. )

**अचला**—हो ! येईन बरं !

**हेडमिस्ट्रेस**—मग ठरलं तर. पण आतां आम्हांला तें मघाशीं म्हटललं. गाणं म्हणून दाखवणार का ?

**शालन**—हो हो ! बाई, उठा ना ? असं काय करतां तुम्ही आज ?

**नलिनी**—अग आपण सुरवात तर करूं. बाई येतीलच आपोआप आपल्यांत.

### पद ८ वें.

**मुली—वनांत फुललं । बागेंत डुललं । पाहून फुल जग सुखावलं ॥धृ.॥**
**अचला—बाल भाव हा जिववी मनाला । भयार्त मन बाई स्थिरावलं॥**
**बागेंत खेळलं । मनांत फुललं । पाहून मम मन सुखावलं ॥**
**वास रंगना निववी भावना । हांसत मुकुला । वितरी भावना ॥**
**विमल मुलांच्या मुकुल भावना । खेळत वितरी शांतवना ॥**
**विकल मनाला दे हळुवारा । कुमुद नवा बाल मेळा ॥ १ ॥**

[ पडदा पडतो. ]

# अंक पांचवा.

[ कन्याविहारांतील दिवाणखाना. एका बाजूला टेबलाशीं हेडमिस्ट्रेस व दुसऱ्या बाजूला शोभनाबाई, कृष्णाबाई व सरलाबाई बसलेल्या आहेत. ]

**हेडमिस्ट्रेस**—एका अति महत्वाच्या प्रश्नाचा विचार करण्याकरितां आपण सर्वजणी इथं जमलों आहोंत. आपल्या कन्याविहारांतील एक अध्यापिका मिस् अचलाबाई, यांच्यावर लादण्यांत आलेल्या आरोपाबद्दल मला आपल्याजवळ चौकशी करायची आहे. हा आरोप माझ्या दक्षतेला कमीपणा आणणारा आहे. शाळेंतील सर्व शिक्षकिणींवर माझी पूर्ण नजर असते. आणि अचलाबाईनीं तर माझं लक्ष पूर्ण वेधून घेतलं आहे. पण तुम्ही म्हणता तसा प्रकार माझ्या दृष्टोप्तत्तीस आलेला नाहीं. तथापि तें कांहीं जरी असलं तरी या प्रकाराबद्दल योग्य ती चौकशी करणं कन्याविहारांतील मुख्य चालक म्हणून माझं कर्तव्य आहे. शोभनाबाई, प्रथम मला आपल्याला कांहीं प्रश्न विचारायचे आहेत.

**शोभनाबाई**—मला प्रश्न विचारायचे आहेत ? वा ! हा चांगलाच खाक्या आहे तुमचा. मलाच गुन्हेगार ठरवायचा बेत आहे वाटतं ?

**हेडमिस्ट्रेस**—तें मी कसं सांगूं ? माझी मनोदेवता मात्र सांगते कीं आपण संस्थेचा थोर गुन्हा करीत आहांत—

**शोभनाबाई**—काय हो सरलाबाई ? माझीच का चौकशी होणार ?

**सरलाबाई**—गुन्हेगाराची चौकशी व्हायला पाहिजे.

**शोभनाबाई**—अगदीं बरोबर. आरोप आहे अचलेवर. आरोपी या नात्यानं प्रथम अचलेची चौकशी होऊं द्या. पण ती या ठिकाणीं कां हजर नाहीं ? कृष्णाबाई, तिला पाठीशीं घातली—

**हेडमिस्ट्रेस**—गुन्हेगार ठरल्याशिवाय अचला इथं येणं शक्य नाहीं. अचलेवर आरोप शाबीत झालाच तर तिच्याकडून तुम्ही सांगाल तें दिव्य करून घ्यायला मी केव्हांही माघार घेणार नाहीं. पण विनाकारण अचलेसारख्या शीलवंत कुमारिकेची मानखंडना मी केव्हांही होऊं देणार नाहीं.

**शोभनाबाई**—मग हा चौकशीचा फार्स तरी कशाला केलात ?

**हेडमिस्ट्रेस**—हा फार्स नाहीं. ही चौकशी आहे.

**कृष्णाबाई**—पण या चौकशींतून कांहीं निष्पन्न होणार आहे का ?

**हेडमिस्ट्रेस**—कां होणार नाहीं ? शोभनाबाई, अचलेविरुद्ध आपली काय तक्रार आहे ?

**शोभनाबाई**—माझी तक्रार कांहीं नाहीं.

**हेडमिस्ट्रेस**—तुमची तक्रार कांहीं नाहीं, मग चौकशीचं कारण ?

**शोभनाबाई**—या कृष्णाबाईनीं अन् या सरला बाईनीं—

**हेडमिस्ट्रेस**—अचलेविरुद्ध आपली कांहींच तक्रार नाही. केवळ यांच्या सांगण्यावरूनच आपण हा चौकशी अर्ज करताय असंच ना ?

**शोभनाबाई**—( कृष्णाबाईकडे पहाते. ) हो ! तसंच नाहीं तर काय ?

**हेडमिस्ट्रेस**—अर्जदाराचं सोंग नीट साधेल ना ?

**कृष्णाबाई**—बाई, तुम्ही विषयाला कलाटणी देऊं पहाता आहां.

**हेडमिस्ट्रेस**—आतां मुद्याकडे वळूं. सांगा शोभनाबाई तुमचं म्हणणं.

**शोभनाबाई**—माझं—नाहीं—आमचं म्हणणं असं कीं, कन्याविहारांत अचलाबाई सारखी अध्यापिका असणं हें कन्याविहाराला लौकीकदृष्टीनं कमीपणाचं आहे. हो ना हो कृष्णाबाई ?

**हेडमिस्ट्रेस**—( हंसते. ) लौकीकदृष्टया कमीपणाचं म्हणजे कसं काय ? अचलाबाई आल्यापासून सर्व दृष्टीनं कन्याविहाराचा लौकीक वाढला पण कांहीं जणांची दृष्टी अधू झाली. अचलाबाई आल्यापासून संस्थेचा उत्कर्ष झाला हें तुम्हांलाही नाकबूल करतां येणार नाहीं.

**सरलाबाई**—उत्कर्ष झाला, होत आहे आणि होईलही. पण—

**हेडमिस्ट्रेस**—चौकशी शोभनाबाईची चालली आहे. इतरांनीं त्यांत भाग घेणं शिस्तीच्या दृष्टीनं योग्य नाहीं. शोभनाबाई, आपल्याला चौकशी करायची आहे. तर ती स्पष्ट आणि मोकळेपणानं झाली पाहिजे. मोघम न बोलतां स्पष्ट शब्दांत सांगून टाका म्हणजे चौकशीचं काम लवकर आटोपतां येईल.

**शोभनाबाई**—अचलेचं अलीकडचं वर्तन शुद्ध नाहीं. अध्यापिकेची वागणूक नेहमी आदर्श असायला पाहिजे. संस्थेच्या हिताच्या दृष्टीनं पाहिलं

तर अचलेच्या चाळ्यांना वेळींच पायबंद घातला गेला नाहीं तर पुढें संस्थेवर—संस्थेवरच काय पण संस्थेंतील प्रत्येक कार्यकर्त्यावर शितोडा उडाल्याशिवाय रहाणार नाहीं.

**हेडमिस्ट्रेस**—अवश्य ! पण शोभनाबाई, एखाद्याच्या शीलाविषयीं संशय घेतांना स्वतःवर केवढी जबाबदारी असते, याचा आपण विचार केला आहे ना ? संशय घेणं सोपं असतं पण तो सिद्ध करणं फार कठीण जातं. अचलेच्या शीलाबद्दल संशय उत्पन्न करणारा असा कोणता पुरावा आपण पुढं करूं शकता ?

**सरलाबाई**—तिच्या प्रेमाचे चाळे चवाठ्यावर आणणारा तिचा पत्रव्यवहारच.

**हेडमिस्ट्रेस**—सरलाबाई, शोभनाबाईची चौकशी चालू असतां मध्येंच बोलून तुम्ही शिस्तभंग करीत आहांत. इतक्या अधीर होऊं नका. तुमचीही योग्य चौकशी होणारच आहे. हं. शोभनाबाई पुरावा आपण हजर करूं शकता का इथं ?

**शोभनाबाई**—का हो सरलाबाई ? पुरावा आपल्याला हजर करतां येईल का?

**हेडमिस्ट्रेस**—एकूण पुरावा तुमच्याजवळ नाहीं तर ?

**शोभनाबाई**—सरलाबाई, आहे का एखादं पत्र तुमच्याजवळ ? ( ती नाहीं म्हणते. ) कृष्णाबाई, तुमच्याजवळ तरी ?

**कृष्णाबाई**—मुद्देमालच नाहींसा केला गेला ना ? तें पत्र जर आमच्याजवळ असतं तर इतकी चौकशी करण्याचं कारणच पडलं नसतं.

**हेडमिस्ट्रेस**—पण प्रेमाचा पत्रव्यवहार असा उल्लेख केल्यानंतर तुम्हांला तें सबळ पुराव्याचं पत्र जरी मिळालं नाहीं तरी दुसरी पत्रं काहीं थोडी-थोडकीं नसतील !

**शोभनाबाई**—पण मला दुसऱ्या पत्रांबद्दल कांहींच माहिती नाहीं.

**हेडमिस्ट्रेस**—आणि माहिती असलेल्या पत्राची माहिती सांगतां येत नाहीं ! हं हं ! शोभनाबाई, दुसऱ्याच्या फुशीनं पुराव्याशिवाय अचलेविरुद्ध तक्रार केलीत ही मोठी नवलाची गोष्ट आहे ! समजा, हें प्रकरण आपल्या बोर्डापुढं ठेवायची पाळी आली तर आपली किती केविलवाणी अवस्था होईल ! रावसाहेब आपल्याला काय म्हणतील ?

**शोभनाबाई**—म्हणजे ? त्यांच्या कानांवर जाणार कीं काय या गोष्टी ?

**हेडमिस्ट्रेस**—जायलाच पाहिजेत. माझ्या कन्याविहारांतील सर्व व्यवहार आरशासारखा अगदीं चोख आहे. आणि या आत्मविश्वासामुळंच मला कशा-चीही भीति वाटत नाहीं. म्हणून म्हणतें शोभनाबाई, आपल्या दर्जाचा विचार करा आणि मगच पुढं पाऊल टाका. मला माहीत नाहीं, मी पाहिलेलं नाहीं, मला यांनीं सांगितलं अन् मी तक्रार केली अशा तऱ्हेची पुळचट विधानं बोर्डाचे सभासद ऐकून घेतील काय ? उलटपक्षीं एका गरीब गाईचा छळ केल्या-बद्दल आपल्याविषयीं केवढा गवगवा होईल याची कल्पना आहे तुम्हांला ?

**शोभनाबाई**—अहो पण मी प्रत्यक्ष पाहिलेलं नसलं तरी कृष्णाबाईनीं तें पाहिलेलं आहे आणि वाचलेलंही आहे.

**हेडमिस्ट्रेस**—बरं ! कुणाचं होतं तें पत्र ?

**शोभनाबाई**—रावसाहेबांचं. त्यांनीं अचलेला पाठवलं होतं तें.

**हेडमिस्ट्रेस**—रावसाहेबांचं ? म्हणजे आमच्या न्यायाधिशालाच आरो-पीच्या पिंजऱ्यांत उभं रहावं लागणार तर ! ( शोभनाबाई घाबरते. ) बरं, आपलं सबळ पुराव्याचं पत्र म्हणतां तें हेंच कीं दुसरं ? (शोभना सरलाकडे पहाते.)

**सरलाबाई**—मला वाटतं तेंच असावं तें. नाहीं का कृष्णाबाई ?

**कृष्णाबाई**—होय. तेंच तें.

**शोभनाबाई**—होय. तेंच तें.

**हेडमिस्ट्रेस**—अस्सं ! आतां मी तुम्हांला असं विचारतें शोभनाबाई, कीं अचलेच्या पत्राचे चाळे रावसाहेबांच्या पत्रांत कसे काय दिसले तुम्हांला ? टाळी एका हातानं वाजत नसते. यावरून त्या पत्रांतला जो कांहीं आक्षिप्त मजकूर तुम्ही वाचला किंवा ऐकला असेल तो रावसाहेबांनीं अचलेबद्दल लिहिलेला असला पाहिजे. अर्थात् अचलेच्या चाळ्यांना रावसाहेबांकडून एक प्रकारें प्रोत्साहन मिळत होतं हें सिद्ध झालंच.

**शोभनाबाई**—कुणाचीं नांवं कशाला घेतां उगाच ! फक्त पत्राचा विचार करा म्हणजे झालं.

**हेडमिस्ट्रेस**—पण त्या पत्राशींच रावसाहेबांचा संबंध आहे ना ? त्यामुळं तक्रारच करायची झाली तर ती एकट्या अचलेविरुद्ध न होतां अचला आणि

रावसाहेब या दोघांविरुद्ध व्हायला पाहिजे. इतकंच नव्हे तर, कन्याविहारांतील एका अध्यापिकेला भूलथापा आणि आमिषें दाखवून फूस लावल्याबदलची तक्रार रावसाहेबांच्याविरुद्ध हेडमिस्ट्रेस या नात्यानं मला करतां येईल.

**शोभनाबाई**—काय ? रावसाहेबांच्याविरुद्ध तक्रार ? छे बाई, असलं नाहीं हो खपायचं मला !

**हेडमिस्ट्रेस**—न्यायाच्या बाबतींत कोणाला खपेल आणि कोणाला खपणार नाहीं याचा विचार करून कसं चालेल ? तुम्ही आपण होऊन चौकशीची मागणी केली आहे. तेव्हां पत्राशीं ज्यांचा ज्यांचा संबंध असेल त्यांचा नामनिर्देश होणार आणि त्यांना दोषही लागणार !

**शोभनाबाई**—नामनिर्देश करा वाटलं तर. पण त्यांना दोष देऊ नका. हो ! प्रतिष्ठित माणसं आम्ही ! चार चौघांत आमची अशी बेअब्रू होणं कांहीं चांगलं नाहीं.

**हेडमिस्ट्रेस**—पण हीं प्रतिष्ठित माणसंच लोकांच्या नादीं लागून आपली प्रतिष्ठा घालवूं लागलीं तर ती संभाळायची कोणी ? शोभनाबाई, तुमच्यासारख्या प्रतिष्ठित माणसांनींच जर असा सावळागोंधळ घालायला सुरवात केली तर त्यांत इतरांचा काय दोष ? मोठ्या लोकांनीं आपल्या वागणुकीचा आदर्श इतर लोकापुढं ठेवला पाहिजे. पण प्रकार अगदीं उलट दिसून येतो. समाजांत पुढाकारानं वावरणारी माणसंच निंद्य वर्तन करायला मागंपुढं पहात नाहींत. त्याकरितां वेळ आली कीं, त्यांचीही हजेरी घेणं भाग पडतं. रावसाहेबांचंही असंच झालं आहे. त्यामुळं त्यांचीही आरोपी या नात्यानं चौकशी होणं जरूर आहे.

**शोभनाबाई**—असं जर असेल तर मी आपली जातेंच कशी ! माझी कांहीं तक्रार नाहीं आणि मला चौकशीची जरूर नाहीं. तक्रार आहे कृष्णाबाईची आणि सरलाबाईची. त्या पाहून घेतील पाहिजे तर

**हेडमिस्ट्रेस**—तरी रावसाहेब सुटत नाहींतच.

**सरलाबाई**—अहो असं काय करता ? एवढं घाबरून जाण्याचं कांहीं कारण नाहीं. थांबा जरा.

**शोभनाबाई**—थांबतें. पण आमच्या यांना जर त्यांत अडकवणार असलांत तर मात्र—

**हेडमिस्ट्रेस**—पण त्यांना अडकवायला प्रत्यक्ष त्यांची सहधर्मचारिणीच तयार झाली तर मग अलबत्यागलबत्यांनीं कां कमी करावं ? शिवाय संस्थेच्या हिताच्या दृष्टीनं तुम्ही अचलेविरुद्ध तक्रार केलीत त्याचा योग्य तो विचार होणं जरूर आहे. एकदां तक्रार केली कीं मग माघार घेणं केव्हांही इष्ट नाहीं. आणि शोभनाबाई, संन्याशाला सुळीं द्यायला निघालं कीं केव्हां केव्हां खरा चोर आपोआपच सांपडतो.

**शोभनाबाई**—बरं तर. चालू दे तुमचं चौकशीचं काम. पण एक करा मात्र. तुमचे सारे प्रश्न या दोघींना विचारा. कुठली या फंदात पडलें कुणास ठाऊक !

**हेडमिस्ट्रेस**—पण शोभनाबाई, फिर्यादी म्हणून राजीनामा दिलांत तरी साक्षीदार म्हणून तुम्हांला साक्ष देणं भाग आहे. शिवाय या गुन्ह्यांमध्यें रावसाहेबच ॲबेटर असल्यामुळं तुमची साक्ष विशेष महत्वाची आहे.

**शोभनाबाई**—सरलाबाई, कृष्णाबाई, ठीकं केलंत हो !

**हेडमिस्ट्रेस**—शोभनाबाई, आतां दुसऱ्याला दोष देण्यांत काय अर्थ आहे ! माझ्या प्रश्नाला उत्तर दिल्याशिवाय तुमची सुटकाच नाहीं. रावसाहेबांच्या वागणुकीबद्दल आपल्याला यापूर्वीं कधीं संशय आला होता का ?

**शोभनाबाई**—मुळींच नाहीं. इतकंच नव्हे तर माझ्या संमतिशिवाय ते कांहींच करीत नाहींत.

**हेडमिस्ट्रेस**—बरं. माझ्याविषयीं तुमचं मत काय आहे ? माझे आणि रावसाहेबांचे संबंध कशाप्रकारचे आहेत ? त्याविषयीं आपल्या मनांत कधीं संशय उत्पन्न झाला होता का ? तुम्हांला माहीतच असेल कीं रावसाहेबांचा आणि आपल्या संस्थेचा फारच निकटचा संबंध आहे. इतकंच नव्हे तर त्यांनींच पुढाकार घेतल्यामुळें ही संस्था जन्मास आली.

**शोभनाबाई**—माझाही त्याला दुजोरा होताच. खरं म्हणाल तर माझ्या शालनच्या शिक्षणासाठींच कन्याविहार काढायला मी रावसाहेबांना आग्रह केलों.

**हेडमिस्ट्रेस**—आणि दुसऱ्याच्या आग्रहाकरतांच त्याच कन्याविहाराच्या अधःपाताला तयार झालांत !

**शोभनाबाई**—छे छे ! असे विचार स्वप्नांतसुद्धां माझ्या मनांत येणार नाहींत.

**हेडमिस्ट्रेस**—विचार मनांत येणार नाहींत. पण कृतींत मात्र उतरायला लागले आहेत. अचलेला रावसाहेबांचं पत्र येतांच आपल्याला संशय आला. मलाही रावसाहेबांची अनेक पत्रं आलीं आहेत. तेव्हां माझ्याही बाबतींत तुम्हांला कांहीं गैरशिस्त वाटतं का ?

**शोभनाबाई**—असं कसं वरं म्हणेन मी ?

**हेडमिस्ट्रेस**—मग अचलेविरूद्ध आपला गैरसमज होण्याचं कारण ?

**शोभनाबाई**—या सरलाबाईंनीं आणि कृष्णाबाईंनीं मला त्या पत्राची हकीकत सांगितली—

**हेडमिस्ट्रेस**—त्यावर आपला विश्वास बसला आणि रावसाहेबांबद्दल गैरविश्वास वाटला असंच ना ?

**शोभनाबाई**—बाई, तुमचे पाहिजे तर मी पाय धरतें पण माझा हा छळ थांबवा अगोदर. या फंदांत पडायची कुठची दुर्बुद्धी आठवली मला देव जाणे !

**हेडमिस्ट्रेस**—सरलाबाई, तुम्ही तें पत्र पाहिलंत का ?

**सरलाबाई**—नाहीं. अचलेजवळ मी तें मागितलं. पण तिनं मला तें न देतां हरवल्याचं सांगितलं.

**हेडमिस्ट्रेस**—आपल्याला तें खरं वाटलं का ?

**सरलाबाई**—होय !

**हेडमिस्ट्रेस**—यापूर्वी तीनं कधीं तुमच्यापासून कांहीं लपवून ठेवलं होतं का ? आपली आणि अचलेची गट्टी तर फार होती. असं असतां तिनं तुम्हांला पत्र न दाखवण्याचं कारण ?

**सरलाबाई**—कारण कांहीं मला सांगतां येत नाहीं. पण माणसाचा काय नेम सांगावा ! केव्हां मन उलटेल कांहीं सांगतां येणार नाहीं.

**हेडमिस्ट्रेस**—बरं पत्रासंबंधीं आपल्याला कोणी सांगितलं ?

**सरलाबाई**—कृष्णाबाईनीं. त्यांनीं मला इतकं तंतोतंत पटवून दिलं कीं, अचलेची पूर्वीची वर्तणूक मायावी होती असं मला वाटूं लागलं.

**हेडमिस्ट्रेस**—ठीक आहे. कृष्णाबाई, अचलेला आलेलं रावसाहेबांचं पत्र तुम्हीं वाचलं आहे नाहीं का ? ( ती होय म्हणते. ) अचलेनं तें पत्र आपण-होऊन दाखवलं कीं तुम्हांला मागावं लागलं ?

**कृष्णाबाई**—असलीं पत्रं मागून का मिळणार आहेत.

**हेडमिस्ट्रेस**—खरं आहे तुमचं म्हणणं.

**कृष्णाबाई**—त्याबरोबरंच पापही आपोआपच उजेडांत येत असतं. प्रेम-पत्रांत दंग झाल्यामुळं मी तिच्याकडे गेलें त्यावेळीं मला तें पत्र टेबलावर पडलेलं दिसलं. अक्षर रावसाहेबांचं होतं म्हणून उचलून घेतलं.

**हेडमिस्ट्रेस**—पत्र वाचून अचलेला तें परत केलंत का ?

**कृष्णाबाई**—मी कशाला तें घेऊन जाऊं माझ्याबरोबर ?

**हेडमिस्ट्रेस**—हें माझ्या प्रश्नाचं उत्तर नाहीं. तुम्ही तें परत केलंत का ?

**कृष्णाबाई**—हो, मी तें ताबडतोब परत दिलं तिला.

**हेडमिस्ट्रेस**—तुमच्या दृष्टीनं तें पत्र एवढं भानगडी उपस्थित करणारं होतं, तर तुम्हीं तें परत करण्यांत मोठी चूक केलीत कृष्णाबाई. शिवाय त्या पत्राचा बाहेर बभ्रा करण्याचं काय कारण होतं तुम्हांला ? कन्याविहारांत जर कांहीं भानगडी उपस्थित झाल्या तर त्या बाहेर जाण्यापूर्वी प्रथम माझ्या कानांवर घालायला नकोत का ? तुम्हांला अचलेविरूद्ध तक्रारच करायची होती तर माझ्याकडे न येतां शोभनाबाईंच्याकडं जाण्याचं कारण ?

**कृष्णाबाई**—पण शोभनाबाईंच्याकडे मी तक्रार केलीच नाहीं मुळीं. या सरलाबाईंनीं त्यांना—

**सरलाबाई**—पण या गोष्टी शोभनाबाईंच्या कानांवर घालायला तुम्हींच नाहीं का मला आग्रह केलांत ? तुम्हीं सांगितलं म्हणून मी गेलें.

**कृष्णाबाई**—मी सांगितलं तुम्हांला त्यांच्याकडे जायला ? चांगलं, चांगलं सांगतां बरं सरलाबाई ?

**सरलाबाई**—वा ! कृष्णाबाई, किती धादांत खोटं बोलतां हो तुम्हीं ?

**हेडमिस्ट्रेस**—तुमच्या या आपसांतल्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यानं चौकशीच्या कामांत व्यत्यय येत आहे. कृष्णाबाई, मी विचारलेल्या प्रश्नाला

उत्तर द्यायचं सोडून तुम्ही सरलाबाईंशीं कशाला वाद घालतां ? तुम्ही जरी प्रत्यक्ष तक्रार केली नसली—

**शोभनाबाई**—नाहीं कशी ? कृष्णाबाईसुद्धां आल्याच होत्या त्यांच्याबरोबर तक्रार घेऊन. या चौकशी मागणीच्या मुळाशीं कृष्णाबाईच आहेत. त्यांनींच तर पत्राचा असा अर्थ लावला.

**हेडमिस्ट्रेस**—कृष्णाबाई, तुम्ही तें पत्र पाकीटांत घालून परत केलंत कीं नुसतंच ?

**कृष्णाबाई**—मला नाहीं आठवत तें. पत्र वाचतांच मला संताप चढला आणि संतापाच्या भरांत मी निघून गेलें.

**हेडमिस्ट्रेस**—आणखी कांहीं होतं का त्या पाकीटांत ?

**कृष्णाबाई**—त्यांत एक चेक होता.

**हेडमिस्ट्रेस**—पाकीट परत करतांना त्यांत चेक होता का ?

**कृष्णाबाई**—परत करतांना त्यांत फक्त चेकच होता.

**हेडमिस्ट्रेस**—अन् रावसाहेबांचं पत्र ? मघां तुम्ही आठवत नाहीं असं म्हणाला होतात.

**कृष्णाबाई**—म्हणजे तुमचं म्हणणं असं कीं तें पत्र मीच लांबवलं ? तें जर माझ्या हातीं आलं असतं तर आमची बाजू अधिक बळकट करतां आली असती.

**हेडमिस्ट्रेस**—तुम्हांला वाटतं का अचलनं पत्र नाहींसं केलं म्हणून ?

**कृष्णाबाई**—माझी खात्रीच आहे त्याबद्दल. नाहींतर नेणारा पत्रच कशाला नेईल ? चेकसुद्धां नेला असतां बरोबर.

**हेडमिस्ट्रेस**—पण अचलेच्या शीलावर शिंतोडा उडवायला चेकचा कांहींच उपयोग झाला नसता. त्याअर्थीं नेणारानं पत्रच नेलं त्यांत अचलेविरुद्ध काहूर माजवण्याखेरीज त्याचा दुसरा कोणताही हेतु असणं शक्य नाहीं हें निश्चित.

**कृष्णाबाई**—पण पत्र दुसऱ्या कुणी लांबवलं असेल असं आपण कशा-वेरून म्हणतां ? अचलेनंच तें नाहींसं केलं असं आपण कां धरून चालत नाहीं ?

**हेडमिस्ट्रेस**—तसा पुरावा नाहीं म्हणून ! पुराव्याशिवाय—तशीच खात्री असल्याशिवाय मी कधींच विधान करीत नाहीं.

**कृष्णाबाई**—बरं दुसऱ्या कुणी तें नाहींसं केलं असं म्हणायला तरी आपल्या जवळ काय पुरावा आहे?

**हेडमिस्ट्रेस**—तो पुरावाच प्रत्यक्ष ऐकवतें आपल्याला. ( घंटा वाजवते. मुली येतात. ) मुलींनों, शाळेच्या वेळांत किंवा इतर वेळीं बाईच्याकडे कुणी येत असतं का ?

**कृष्णाबाई**—असं आडवळणानं कशाला विचारता ? स्पष्टच विचारा कीं रावसाहेब—

**शालन**—माझे पपा ? छट् ! तें नाहीं येत कधीं बाईची भेट घ्यायला.

**हेडमिस्ट्रेस**—तुमच्या बाईंना रावसाहेबांचीं पत्रं येतात का ?

**नलिनी**—नाहीं बाई.

**सरलाबाई**—या पोरींना काय समजणार त्यांत ? आलीच पत्रं तर अचला कशाला दाखवील यांना !

**वासंती**—नाहीं बरं. बाई आम्हांला सर्व कांहीं सांगतात. कांहीं म्हणतां कांहीं लपवून ठेवीत नाहींत त्या आमच्यापासून.

**शालन**—परवांच माझ्या पपांनीं आमच्या बाईंना एक प्रशस्तिपत्र आणि शाळेला ५००० रुपयांचा एक चेक पाठवला आहे. तेंसुद्धां बाईंनीं सांगितलं आम्हांला.

**कृष्णाबाई**—आलं होतं ना पत्र रावसाहेबांचं ? मग मघां नलिनीनं नाहीं कसं सांगितलं ?

**नलिनी**—मग तें कांहीं खोटं नाहीं. त्यांनीं विचारलं होतं कीं नेहमीं येतात का ? नेहमीं येत नसतात म्हणून नाहीं म्हटलं.

**हेडमिस्ट्रेस**—बरं शालन, आंत जा आणि तुमच्या बाईंना म्हणावं कीं रावसाहेबांचं पत्र बाहेर घेऊन या.

**शालन**—पण बाई, तें पत्र कांहीं आमच्या बाईजवळ नाहीं.

**कृष्णाबाई**—तुला कोणी सांगितलं या चांभारचौकशा करायला ? आंत जाऊन सांग म्हटलं कीं सांगायला जायचं पटकन.

**हेडमिस्ट्रेस**—तिला काय रागावता उगाच ? शालन काय म्हणतेस तूं ?

**शालन**—तें पत्र कांहीं आमच्या बाईजवळ नाहीं आतां.

**हेडमिस्ट्रेस**—मग कुठं आहे तें ?

**शालन**—( कृष्णाबाईकडे बोट दाखवून ) यांच्याजवळ. ( सर्वजणी कृष्णाबाईकडे आश्चर्यानें पाहतात. ती बावरते. )

**कृष्णाबाई**—काय वेडबीड तर नाहीं लागलं तुला वाटेल तें बरळायला ?

**शालन**—नाहीं बरं. मी चांगली शुद्धींत आहे. बाई, आम्ही जेव्हां यांना फुलं द्यायला गेलों तेव्हां मला तें पत्र त्यांच्या टेबलावर दिसलं. माझ्या पपांचं आमच्या बाईंना आलेलं पत्र मी तेव्हांच ओळखलं. आमच्या बाई तें न्यायला विसरल्या असतील म्हणून मी त्यांना तें घेऊन जाण्याबद्दल विचारलं. तर त्या ज्या कांहीं माझ्यावर संतापल्या कीं कांहीं विचारूं नका. त्यांनीं तसंच तें पत्र घेतलं आणि ( कृष्णाबाईजवळ असलेल्या पुस्तकाकडे पाहून ) याच पुस्तकांत खुपसून ठेवलं तें !

**हेडमिस्ट्रेस**—जा तुम्ही आतां आणि बाईंना इकडे पाठवून द्या. ( मुली जातात. ) का कृष्णाबाई, ऐकलांत पुरावा ? कां, आतां गप्प कां ? आणखी कांहीं सांगायचं आहे का तुम्हांला ? सांगायचं नसेल तर हजर करा पाहूं तें पत्र अगोदर. ( कृष्णाबाई पत्र देते. हेडमिस्ट्रेस वाचते.) शोभनाबाई, सरलाबाई, अचलेच्या चारित्र्याला धक्का पोंचणारं असं काय आहे या पत्रांत ?

**शोभनाबाई**—पाहूं बरं तें पत्र. ( पत्र घेऊन वाचते. ) अगबाई, हें पत्र तर आम्ही दोघां मिळून लिहिलं.

**हेडमिस्ट्रेस**—आतां मात्र कमाल झाली तुमची ! शोभनाबाई, बायकोच्या देखत दुसऱ्याबाईला प्रेमपत्र लिहिणारा हा कुणी मुलखावेगळाच प्रेमवीर दिसतो आहे. सरलाबाई, तुह्मीसुद्धां सरळ विचार न करतां अचलेविरुद्ध रचलेल्या कारस्थानाला जाऊन मिळालांत मोठी खेदाची गोष्ट आहे ही. तुमच्या या कृतीनं अचलेच्या कोमल मनावर किती कठोर आघात झाला आहे याची कल्पना आहे का तुह्मांला ?

**सरलाबाई**—पण बाई, त्यावेळीं मला कशी भुरळ पडली देव जाणे ! तरी मला संशय आलाच होता. पण अखेर मी फसलेंच. कृष्णाबाई, चांगलं काळं फासलंत बरं !

**कृष्णाबाई**—काळं मी फासलं नसून तें तुह्मी स्वतःच फासून घेतलं आहे. माझ्यावर विश्वास टाकण्यापूर्वी मी आपल्याला बजावलं होतं. तेव्हां विचार केलांत नाहीं. आतां मला बोल लावण्यांत काय अर्थ आहे ? माझा सूड मी उगवला !

**शोभनाबाई**—कसला हो सूड उगवलांत ? नुसता राईचा पर्वत रचलांत आणि शेवटीं त्या पर्वताखालीं स्वतःच दडपून गेलांत. हाच का सूड उगवलांत तुम्ही ?

**कृष्णाबाई**—मी जरी दडपून गेलें असलें तरी आपल्यासारखी श्रीमंत आणि सरलाबाईसारखी भोळीभाबडी माणसं स्वतःच्या सारासार बुद्धीचा उपयोग न करतां दुसऱ्यांच्या तंत्रानं वागून कशी फशीं पडतात हें मात्र जगाच्या चांगलंच निदर्शनास आणून दिलं आहे.

**हेडमिस्ट्रेस**—आणि त्याबरोबरच स्वतःच्या क्षुद्र वृत्तीचं प्रदर्शन करून स्वतःचीही जगाला पूर्ण ओळख करून दिलीत. कृष्णाबाई, अचलेसारख्या कर्तृत्ववान अध्यापिकेवर अपवित्र चारित्र्याचा आरोप करून क्षणभर कन्या-विहारांत वादळ उठवलंत काय मिळालं आपल्याला त्यापासून ? अचलेचा मत्सर तुम्हांला कां वाटावा ? तुमचा मार्ग निराळा आहे. तिचा मार्ग निराळा आहे. असं असतां विनाकारणच अशा प्रकारचं कपटनाटक रचून तुम्ही स्वतःचं मोठं नुकसान करून घेतलं आहे. संस्थेच्या दृष्टीनं पाहिलं तर संस्थेतील अध्यापिकेवर निखालस खोटा आरोप करून तुम्ही संस्थेचा घोर अपराध केला आहे.

**कृष्णाबाई**—त्याबद्दल प्रायःश्चित्त घ्यायला मी तयार आहे. झाल्या प्रकारानं आतां संस्थेंत माझं कोणाशीं पटेल असं मला मुळींच वाटत नाहीं.

**शोभनाबाई**—तें सांगायला तुम्ही नको. काय बाई तरी कारवाई ! दोन वेळां फसवलं मला. मीही कशी फसलें देव जाणे ! ( अचला येते. शोभना जवळ जाते. ) अचलाबाई, तुमच्याविरुद्ध विनाकारण तक्रारअर्ज खरडल्याबद्दल आम्ही फार दिलगीर आहोंत. केवळ कृष्णाबाईंनीं पुरवलेल्या माहितीवरूनच —

**कृष्णाबाई**—आतां कशाला माझं नांव घेतां उगाच ?

**शोभनाबाई**—मीच काय पण प्रत्येक जण आपलं नांव घेईल. कमाईच तशी केली आहे नांवाची तुम्ही !

**कृष्णाबाई**—बाई, यापुढं कन्याविहारांत काम करण्याची माझी इच्छा नाहीं. आजपासून कन्याविहाराचा आणि माझा संबंध सुटला. माझ्या राजीनाम्याचा आपण स्वीकार करून मला मोकळं करावं एवढीच माझी आपल्याला विनंति आहे.

**सरलाबाई**—अहो पण कृष्णाबाई, एवढं राजीनाम्यापर्यंत कशाला यायला पाहिजे ? झालं गेलं विसरून जा. पुन्हां आपलं पहिल्या पासून—

**शोभनाबाई**—कशाला आग्रह करतां सरलाबाई ? अहो, जाऊन जाऊन जाणार कुठं ? ही संस्था नाहींतर दुसरी. नशिबाची मास्तरकी कांहीं सुटत नाहीं आतां. नाहींतर मला वाटतं कीं आज राजीनामा देईल आणि येईल त्या लक्ष्मी-बाईसारखी चार महिन्यांनीं पुन्हां परत.

**कृष्णाबाई**—ही लक्ष्मीबाई नसून कृष्णाबाई आहे हें लक्षांत ठेवा. लक्ष्मीबाई-सारखीं सगळींच माणसं आपली तत्त्वं, आपली वचनं बगलेंत गुंडाळून ठेवतील असं वाटलं होय तुम्हांला ? पण हा तुमचा भ्रम आहे. मला जगांत मानानं मिरवायचं आहे आणि अखेर पर्यंत मी मानानंच जगेन हें पक्कं ध्यानांत असूंद्या. माझ्या राजीनाम्याचा—

**हेडमिस्ट्रेस**—आपल्या राजीनाम्याचा योग्य विचार बोर्डापुढं होईलच. पण अचलेची तुम्ही जी नाचक्की केलीत त्याबद्दल जर अचलेनं बोर्डापुढं चौकशीची मागणी केली तर त्याचा जाब दिल्याशिवाय आपली मुक्तता होणं शक्य नाहीं.

**शोभनाबाई**—अचलाबाई कदाचित् तें करणार नाहीं. पण मी मात्र हें प्रकरण काढल्याशिवाय रहाणार नाहीं.

**हेडमिस्ट्रेस**—चुकताहांत तुम्ही शोभनाबाई. अचलेच्या स्वभावाप्रमाणं तिचं करणं अगदीं योग्य होईल.

**अचला**—यापुढं जाण्याची माझी इच्छा नाहीं. माझा कोणीही मत्सर केला तरी मला कोणाचाच मत्सर वाटणार नाहीं. कृष्णाबाई, तुमच्याविरुद्ध माझी कांहींच तक्रार नाहीं. सरलाबाई, तुम्ही तर माझ्या जिवाभावाच्या मैत्रिणी ! मैत्रिणींबद्दल मनांत काळंबेरं ठेवायला मी कांहीं काळी नागीण नाहीं. झालं तें गेलं. त्याचा पुन्हां विचारच नको.

**सरलाबाई**—अचले, किती थोर हृदय आहे तुझं ! खरोखर, आम्ही तुझा विनाकारण छळ केला. तुझ्यावर नाहीं नाहीं तें बालंट रचलं. आम्ही तुझी क्षमा मागतों.

**शोभनाबाई**—अचलाबाई, आज तुमची खरी योग्यता मला कळली.

पद ९ वें.

**शमवाया छालना तापा । सखये लाज ना या जिवा ॥ ध्रु० ॥**
**दलित भाजना करि साचा । अजि रुचला हा अभिचार ॥ १ ॥**

आतां यापुढं तुमच्याविरुद्ध कोणीही तक्रार केली तरी ही शोभनाबाई तिथल्या तिथंच त्याला दडपून टाकल्याशिवाय खास रहाणार नाहीं.

**अचला**—कृष्णाबाई, आपण संस्था सोडून जातां यामुळं मला जास्त दुःख होत आहे. तुमच्या राजीनाम्याला कारण मी झालें याकरितां मी आपली क्षमा मागतें. आपण मला विसरूं नका. मीही आपल्याला विसरणार नाहीं.

**कृष्णाबाई**—आणि मी विसरेन होय ? तुझी आठवण मला आतां जन्माचीच पुरली आहे. बस्स ! आतां या ठिकाणीं एक क्षणभरही थांबण्याची माझी इच्छा नाहीं. ( जाते. )

**शोभनाबाई**—गेली एकदांची धिंडका. बाकी इतकी ही असेल अशी मला मुळींच कल्पना नव्हती. बरं बाई, सरलाबाई, आणि अचलाबाई तुम्ही, उद्यां सायंकाळीं आपण मुलींना घेऊन आमच्या बंगल्यावर यायचं. तुम्हां सर्वांना एक गार्डनपार्टी द्यायचा माझा विचार आहे. माझ्या आमंत्रणाचा आपण स्वीकार कराल अशी मला खात्री आहे.

**हेडमिस्ट्रेस**—आपल्या आमंत्रणाचा अनादर आमच्याकडून कसा होईल ?

**शोभनाबाई**—अचलाबाई, दुसऱ्याच्या नादीं लागून तुमचा घोर अपराध केल्याबद्दल मला प्रायःश्चित्त घेतलंच पाहिजे. आपला शैक्षणीक दर्जा वाढवण्याकरितां मी आपल्याला परदेशीं पाठवण्याची रावसाहेबांजवळ स्वतः जातीनं खटपट करीन. माझी खात्री आहे कीं त्यांत मला यश येईलच.

**हेडमिस्ट्रेस**—म्हणजे ? हा प्रकार तुम्ही रावसाहेबांच्या कानांवर घालणार तर ?

**शोभनाबाई**—होय. असं करण्यांत माझ्या पदरीं जरी मूर्खपणा येणार आहे तरीसुद्धां अपराधाचं प्राय:श्चित्त म्हणून मला तो सहन केलाच पाहिजे.

**सरलाबाई**—आतां एका माणसाचा रुबाब काय विचारतां ! आमच्या बागेंतली ही फुलराणी पॅरिसच्या नंदनवनांत नाचणार तर ! अहो बाई ! आतां काय अचला फॉरीन रिटर्ण्ड होणार ! पण अचले, आम्हांला मात्र विसरूं नकोस हं नंतर.

**अचला**—शक्य तरी आहे का तुम्हांला विसरणं ? मी तुम्हांला केव्हांही विसरलें नव्हते आणि आतां यापुढंही विसरणार नाहीं. तुमच्या पुण्याईमुळंच तर माझा उत्कर्ष होत आहे. शोभनाबाई, आपल्या उपकाराबद्दल मी आपली कशी उतराई होऊं ?

**शोभनाबाई**—अचलाबाई, तर मग असं करा. मुलींना बोलवा पाहूं बाहेर. आजच्या आनंदप्रसंगीं करमणूक तर अवश्य पाहिजे. ( अचला जाते. )

**हेडमिस्ट्रेस**—शोभनाबाई, सरलाबाई, अजून कांहीं संशय नाहीं ना उरला?

**शोभनाबाई**—आतां माझी झाली तेवढी शोभा पुरे नाहीं का झाली ?

## पद १० वें.

मुली—( गात येतात. )

चला गाऊं या झणीं । प्रेमाचें नव गान ग !  
वश गाई गोपाला । मधु मुरलीचें त्यां प्रेम ग !  
अलि घाली भंवतीं पिंगा । कमलाचें मधु प्रेम तयाला !  
पञ्जरिं बसला नाग डोलवी । पुंगीचा मधु नाद प्रेमला !  
भोळ्या भाबड्या हरणीला । गान विसरवी मरणाला !  
माझ्या बाईंना तसं । बालांचें या वेड ग ॥ १ ॥

**शालन**—आज कांहीं आमची परीक्षा नाहीं ना आई ?

**शोभनाबाई**—नाहीं बरं. आज माझीच परीक्षा झाली बाई !

**शालन**—आई, तुझी परीक्षा ? आणि आमच्या मोठ्या बाईंनी घेतली ? अय्या ! आईची परीक्षा ! ( मुली हंसतात. )

**हेडमिस्ट्रेस**—चला आतां आंत.

**शोभनाबाई**—पण त्यापूर्वी अचलाबाई एक गाणं होऊं द्या.

**शालन**—पण आतां आमच्या बाईवर रागावणार नाहींस ना? नाहींतर म्हणशील कीं, शाळेंत नुसता धिंगाणा घालायला शिकवतात बाई!

**शोभनाबाई**—नाहीं बरं. तुमच्या बाईच्या शिक्षणाबद्दल माझी पूर्ण खात्री झाली आहे. तुमचं भाग्य थोर म्हणूनचं तुम्हांला अशा प्रेमळ बाई लाभल्या आहेत. हं अचलाबाई, करा सुरवात आतां.

**पद ११ वें.**

**अचला**—या या! सदया, या गाया।
अजि प्रसंग अनुपम असला ॥ ध्रु. ॥

**सरलाबाई**—विमल चंद्रिका ग्रासायाला।
राहु गमे का भयकर सजला ॥

**शोभनाबाई**— शोभसि तूं धवल चंद्रिका।
चकोर मलगी या शुभवदना।
कुमुदवृंद कीं सुभग उमलला।

**सरलाबाई**— नंदनवनिं या वाग्देवीच्या।
वरद विजय हा कवनिं गाऊं या।
प्रेमळ भावा भुवनिं भाऊं या ॥

IRBK-0101623

IRBK-0101623

CLEANLINESS IS GODLINESS.

• गिऱ्हाईकांचा संतोष हा आमचा फायदा.

# धी कॉमरेड लॉन्ड्री,

ठि.:—हाजी मंझील, व्हिन्सेंट रोड, दादर चित्रा सिनेमासमोर कपडे धुण्याचे, रंगविण्याचें व ड्रायक्लीनींगचे काम खास देखरेखीखालीं करण्यांत येतें. अर्जंट कपडे २४ तासांनीं मिळतील. एरव्ही कपडे चार दिवसानीं मिळतील.

कपडे घरपोंच करण्याची व धुण्यासाठीं आणण्याची खास सोय.

## सफेत कपडे तीन पैसे.

प्रो.:—श्री. शं. र. जामसांडेकर. श्री. ग. रा. ओटवकर.

एकदां अनुभव घेऊन खात्री करा.

---

# श्री कृष्ण दुग्धालय.

ठिकाणा—भारतमाता सिनेमाचे बाजूस, लालबाग मुंबई १२

आमचे येथें केशरी पेढे, बर्फी, दुधीहलवा, श्रीखंडवडी

तुपांतील चिवडा शिवाय आमचीं स्पेशल पेयें—

• मसाल्याचें दूध, थंडगार पियूष,

मधुर ताक, सरबत वगैरे

माल मिळेल.

गिऱ्हाइकांच्या सोईसाठीं कुपनसिस्टिम सुरू आहे.

विद्यार्थी-विद्यार्थिनींना शालेय रंगभूमीवर करतां येण्याजोग्या चटकदार नाटिकांची निवड करून आपलें सम्मेलन यशस्वी करा.

| पुरुषपात्रविरहित. | | स्त्रीपात्रविरहित. | |
|---|---|---|---|
| संगीत | | संगीत | |
| १ सावत्र-संसार | किं. ३ आ. | १ पाठीराखा | किं. ४ आ. |
| २ मुलींचा खेळ | ,, १॥ ,, | २ आमची जात | ,, ४ ,, |
| ३ साक्षरता | ,, २ ,, | ३ मुठीचा मार | ,, ३ ,, |
| ४ मुलींचा मेळा | ,, २ ,, | ४ चैनीची चट | ,, १॥ ,, |
| ५ अध्यापिका | ,, ६ ,, | ५ खरा धर्मात्मा | ,, ४ ,, |
| ६ पोरींचा नाद | ,, २ ,, | ६ केवळ मौज | ,, ॥ ,, |

म. ग्रं. सं., ठाणे, वाचनालय शाखा.
क्र. 9623 नों.
दि. 3/1/65

पुस्तकें मिळण्याचीं ठिकाणें:—

१ श्री. पां. अ. वेलणकर. ३२, लतीफ बिल्डींग, व्हिन्सेंट रोड, दादर.

२ ,, स. वा. जोग. १०९, प्रभासदन, हिंदु कॉलनी, दादर.

३ मेसर्स परचुरे पुराणिक आणि मंडळी. माधवबाग, मुंबई.

४ ,, तुकाराम पुंडलीक शेट्ये. माधवबाग, मुंबई,

५ केमकर आणि मंडळी, गिरगांव बॅक रोड, मुंबई.

६ जी. के. ब्रदर्स, नाशिक.

तुकाराम प्रिं. प्रेस, मांगलवाडी मुं. नं. ४

# श्री. वेलणकर यांचीं आगामी नाटकें.

## — सामाजिक —

ओळखीचा चोर.

वशिला.

नाटककार.

## — ऐतिहासिक —

बंडखोर.

स्वराज्यांत.

नरकेसरी.

## — पौराणिक —

गर्वहरण.

पतिव्रता.

ब्रह्मचारी.